# आधुनिक केसरी

शनिवार, 30 जुलै 2022

⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 07

Title Code : MAHMAR51117

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 30 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-07 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


# २४ तासांत ट्विट डिलीट करा

## काँग्रेसच्या नेत्यांना कोर्टाने बजावले समन्स

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भाजपा नेत्या स्मृती इराणी आणि त्यांच्या मुलीवर करण्यात आलेल्या आरोप प्रकरणी दिल्ली हायकोर्टाने काँग्रेस नेत्यांना फटकारले आहे. हायकोर्टाने काँग्रेस नेत्यांना संबंधित ट्वीट तात्काळ डिलीट करण्याचा आदेश दिला आहे. गोव्यातील एका रेस्तराँ प्रकरणी हे आरोप करण्यात आले आहेत. हा रेस्तराँ स्मृती इराणी यांच्या मुलीच्या मालकीचा असून यामध्ये बेकायदेशीरपणे मद्यालय चालवले जात असल्याचा काँग्रेस नेत्यांचा आरोप आहे. स्मृती इराणी यांनी याविरोधात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. कोर्टाने काँग्रेसच्या तिन्ही नेत्यांना समन्स बजावले आहे.**

दिल्ली हायकोर्टाने काँग्रेस नेते जयराम रमेश, पवन खेरा आणि नेट्टा डिसूजा यांना ट्वीट डिलीट करण्यास सांगितले आहे. तसेच १८ ऑगस्टला अब्रुनुकसानीच्या खटल्यासाठी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. जर काँग्रेस नेत्यांनी ट्वीट डिलीट केले नाही, तर ट्विटरला हे ट्वीट काढावे लागतील असे स्पष्ट केले आहे.

स्मृती इराणी यांनी दाखल केलेल्या खटला प्रकरणी दिल्ली हायकोर्टाने आम्हाला उत्तर देण्यासाठी नोटीस बजावली आहे. आम्ही कोर्टासमोर तथ्य मांडण्याची वाट पाहत आहोत. स्मृती इराणी यांनी आम्ही आव्हान देऊ आणि त्यांचे आरोप खोटे ठरवू, असे ट्वीट जयराम रमेश यांनी केले आहे.

काँग्रेस नेत्यांनी स्मृती इराणी यांच्या मुलीचे गोव्यात सिली सोल्स कॅफे अँड बार नावे अवैध मद्यालय सुरु असल्याचा आरोप केला आहे. स्मृती इराणी यांनी मात्र हे आरोप फेटाळले असून हे आरोप निराधार असून, मुलीची तसेच आपली बदनामी केली जात असल्याचे म्हटले आहे. स्मृती इराणी यांना तात्काळ मंत्रिमंडळातून बाहेर काढावे अशी काँग्रेस नेत्यांची मागणी आहे.




### स्मृती इराणींकडून काँग्रेस नेत्यांना नोटिसा

स्मृती इराणी यांनी रविवारी काँग्रेस नेते जयराम रमेश आणि पवन खेरा यांना नोटिसा बजावल्या. आपल्या मुलीवर निराधार आणि खोटे आरोप केल्याप्रकरणी माफी मागा अशी मागणी त्यांनी केली. जर त्यांनी बिनशर्त माफी मागितली नाही आणि आरोप मागे घेतले नाहीत तर दिवाणी आणि फौजदारी कारवाई सुरू करु असा इशारा त्यांनी दिला आहे. ही नोटीस महिला काँग्रेस नेत्या नेट्टा डिसूजा आणि काँग्रेस पक्षालाही पाठवण्यात आली आहे. आमच्या आशिलाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न झाल्याचाही नोटीसमध्ये उल्लेख आहे.

# जग बदल घालुनि घाव, सांगून गेले मला भीमराव..

आधुनिक केसरी

लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकशाहीर अमर शेख, द ना. गव्हाणकर यांच्या समवेत आपल्या शाहिरीच्या माध्यमातून योगदान दिले. आणि ते अतुलनीय राहिले.साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या रचनांमध्ये कटाव, शिलकार, टाकण्या, छक्कड, स्थळाकाळाच्या महिमा सांगणाऱ्या लावण्या, पोवाडे इत्यादी काव्य पद्धतींचा अवलंब केला. त्यांची सादरीकरणाची पध्दत अफलातून होती. छककड, पोवाडे यांचे सादरीकरण करताना ते निश्चितच मनामनांत एक उर्जा पेरायचे. त्या कलांमधून त्यांच्या प्रतिभाशील व्यक्तीमत्वाचे सदोदित दर्शन होत असायचे. अण्णाभाऊंनी तमाशासारख्या निकाल रंजन करणाऱ्या लोकनाट्याच्या गायकीचा वापर चळवळीसाठी केला. या चळवळीमुळे आंदोलनांना एक वेगळीच धार मिळत गेली. आणि म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊंचे नाव आदाराने घ्यावेच लागते.






लोकरंगभूमीवर प्रयोगात्मक लोककलांची सुरुवात गणेशाच्या वंदनाने होते. त्याला गण असे म्हणतात. तोच गण लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी गणेशासाठी वापरण्याऐवजी छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करणारा गण लिहिला. त्या गणात अण्णाभाऊ म्हणतात...

"प्रथम माय भूचा चरणा छत्रपती शिवाजी चरणा स्मरूनी गातो कवना"

किंवा

गणेशाला वंदन करण्याऐवजी मातृभूमीला वंदन अण्णाभाऊ साठे यांनी पुढील प्रमाणे केलेले आहे ते म्हणतात...

"विश्वव्यापी जनगणना तुझं करून वंदना गातो शाहिरी कवणा काल तमाशा नमुनी आरंभीलाजी सेवा हो करू आम्ही सेवा आशीर्वाद द्यावा आम्हाला जीजी..."

अण्णाभाऊ साठेंचा स्टालिंन गार्डचा पोवाडा असेल, रशियाची क्रांती असेल, किंवा संयुक्त महाराष्ट्राची लावणी माझी मैना असेल या सगळ्याच ठिकाणी आपल्या कवणांची बांधणी ही परिवर्तनवादी चळवळीसाठी वापरली. तो परिवर्तनवादी विचार तावून सुलाखून निघालेला होता. समाजव्यवस्थेत त्याकाळात पसरलेला द्वेषमुलकारक विचार पदोपदी हाणून पाडण्यासाठी शाहिरीच्या माध्यमातून अण्णाभाऊ सतत तळपळत राहिले. सोबतीला इतर सहकाऱ्यांच्या विचारांचे अनमोल मार्गदर्शन त्यांना मिळत गेल्याने यातून अण्णाभाऊंची प्रतिभा बहरत गेली. आणि त्याचे प्रतिबिंब समाजात उमटत गेले.

मुंबईसह महाराष्ट्र, मराठी एक भाषिक राज्य व्हावं म्हणून अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कवणांचा उपयोग केला. त्या कवनांना भावनिक विचारांची धार दिली. ते म्हणतात "मुंबईत उंचावरील मलबार हिल इंद्रपुरी कुबेराची वस्ती तिथे सुखभोगती परळत राहणारे रातन दिस राबणारी मिळेल ते खाऊन या घामगाळते." मुंबईचे जगणे, गरिबांचे हाल, आणि उच्चभ्रू लोकांचे जगणे निरीक्षणातून संवेदनशीलपणे जेव्हा मांडतात तेव्हा अण्णाभाऊंच्या वैचारिक विचारांचे प्रगल्भपणे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून आपल्या शाहीरीचा डबा, हातामध्ये अमळनेरचे हुतात्मे या पोवाड्याच्या माध्यमातून त्यांनी खंडित महाराष्ट्राला एक संत बनवावं म्हणून योगदान देतात. पुढे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डॉ. बाबासाहेबांचे स्मरण करून फकिरासारखी सर्वश्रेष्ठ कादंबरी बाबासाहेबांना अर्पण करून बाबासाहेबांनी दिलेला समतेचा उपदेश आपल्या कवणांद्वारे अण्णाभाऊ जगासमोर ठेवतात. आणि ते म्हणतात...

"जग बदल घालुनी घाव सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का ऐरावत अंग झाडून निघ बाहेर घे बिनी वरती धाव सांगून गेले मला भीमराव."

म्हणूनच अण्णाभाऊ साठे तावून सुलाखून निघालेले आणि शोषणमुक्तीसाठी एल्गार पुकारत उभे राहिलेले व्यक्तिमत्त्व राहिले.

**(शब्दांकन- बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद)**

# ११ दहशतवादी पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**गुवाहाटी :** आसाममध्ये दहशतवाद्यांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. आसाम पोलिसांनी ११ जणांना ताब्यात करण्यात आली आहे. अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट आणि अन्सारुल्ला बांग्ला या दहशतवादी संघटनांशी त्यांच्या संबंध असल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्यांपैकी एकाला मोरीगाव येथून ताब्यात घेण्यात आले आहे. हा व्यक्ती मदरसा शिक्षक असल्याचे पुढे आले आहे. मुस्तफा असे या व्यक्तीचे नाव आहे.

आसामा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्या ११ जणांचा अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट आणि अन्सारुल्ला बांग्ला या दहशतवादी संघटनांशी संबंध आहे. तसेच त्यांच्याकडून काही इलेट्रॉनिक उपकरणे आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहे. मोरीगाव जिल्ह्यातील सहारिया गावात राहणारा आरोपी मुस्तफा उर्फ मुफ्ती मुस्तफा अन्सारुल्ला बांगला टीम (एबीटी) मॉड्यूलचा हा भारतातील प्रमुख होता. तो सहारिया गावात जमीउल हुदा मदरसा नावाने मदरसा चालवतो. पोलिसांनी हा मदरसा सील केला आहे.

दरम्यान, या कारवाईसंदर्भात आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. पोलिसांनी आसाममधील बारपेटा आणि मोरीगाव जिल्ह्यातून दोन जिहादी मॉड्यूल पकडले आहेत. या सर्वांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी तपास सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# भोसलेंनी लंडनमध्ये ३०० कोटींची संपत्ती खरेदी केली : सीबीआय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय तपास यंत्रणा म्हणजेच सीबीआयने यस बँक आणि डीएचएफएल प्रकरणामध्ये पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रामध्ये अटकेत असलेल्या पुण्यातील बांधकाम व्यवसायिक अविनाश भोसले यांनी वेगवेगळ्या माध्यमातून मिळवलेला ३०० कोटींचा निधी लंडनमध्ये संपत्ती विकत घेण्यासाठी वापरल्याचा उल्लेख करण्यात आला. अविनाश भोसले यांना २०१८ साली यस बँकेचे राणा कपूर यांच्या माध्यमातून ७०० कोटींचे कर्ज देण्यात आले होते. याच पौशांमधून भोसले यांनी लंडनमधील फाइव्ह स्ट्रॅण्ड येथे संपत्ती विकत घेतली असून तिची किंमत आता एक हजार कोटी इतकी आहे.

# भाजपा उपाध्यक्षांच्या फार्महाऊसमधून स्फोटके आणि शस्त्रे जप्त


आधुनिक केसरी न्यूज

**शिलॉंग :** सेक्स रॅकेट चालवल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेले मेघालय भाजपाचे उपाध्यक्ष बर्नार्ड एन मारक यांच्या फार्महाऊसमधून पोलिसांनी स्फोटक साहित्य आणि शस्त्रे जप्त केली आहे. यामध्ये ३५ जिलेटिन कांड्या आणि १०० डिटोनेटर्सचादेखील समावेश आहे. मारक यांच्या तुरा येथील फार्महाऊसवर पोलिसांनी ही कारवाई केली.

मारक यांच्या तुरा येथील फार्महाऊसवरून सेक्स रॅकेट सुरू असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली या माहितीच्या आधारे पोलिसांनी २२ जुलैरोजी याठिकाणी छापा टाकला होता. यावेळी ७३ जणांना ताब्यात घेण्यात आले होते. यामध्ये ६ अल्पवयीनांचादेखील समावेश होता. पोलिसांनी सर्व अल्पवयीनांना वैद्यकीय तपाणीसाठी नेल्यानंतर त्यांच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले होते.

दरम्यान, पोलिसांनी बर्नार्ड एन मारक यांच्याविरोधात स्फोटक पदार्थ कायदा आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्यांना अटकही करण्यात आली आहे. मारक यांच्यावर यापूर्वी आयपीसी आणि अनैतिक तस्करी (प्रतिबंध) कायदा, १९५६ यासह एकूण २५ गुन्हे दाखल आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## मृत्यूकडून जीवनाकडे...

ती विचार करते की ज्यांनी कोणी ती आणली असेल त्यांची पंचाईत होईल म्हणून ती तो विचार सोडून देते. अतिश्रमाने ती तिथेच थकून झोपी जाते.
दुसऱ्या दिवशी काही लोक तिथे येतात. या मुलीला पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटते कारण अशा प्रचंड, भयानक जंगलात ही एकटीच तरुण मुलगी कुठून आणि कशी आली हा प्रश्न त्यांना पडतो. मग ज्युलियन त्यांना सगळी हकीगत सांगते. ती माणसे मग तिच्यावर थोडाफार औषधोपचार करतात. त्यांच्याजवळ असलेले खायला देतात. लवकरच तिच्या वडिलांची आणि तिची भेट घडवून आणतात. तिच्या वडिलांची अवस्थाही अत्यंत वाईट झालेली असते. या सगळ्या घटनेचा मानसिक परिणाम त्यांच्यावरही झालेला असतो. ज्युलियन त्यांना तिच्या आईबद्दल विचारते. पण त्यांनाही अजून तरी तिच्याबद्दल काही कळलेले नसते. ज्युलियन थोडी बरी झाल्यावर त्या अपघातग्रस्त विमानाच्या शोध घेणाऱ्या पथकात ती सहभागी होते. आपल्या आईचा शोध घेते. अखेर तिची आई त्यांना सापडते. पण अपघातामुळे ती प्रचंड जखमी होऊन यातनांना तोंड देत असते. तिला दवाखान्यात नेण्यात येते पण ती काही जगत नाही. ज्युलिअनच्या जखमा अजून पूर्णपणे बऱ्या झालेल्या नसतात. तिला पुढील उपचारासाठी जर्मनीत नेण्यात येते. तिथे ती बरी होते.
पण धन्य ती ज्युलियन की एवढ्या घटनेनंतर देखील ती पुढे आपल्या वडिलांसोबतच अमेझॉनच्या जंगलात शोधकार्यासाठी स्वतःला वाहून घेते. प्राणिशास्त्रात डॉक्टरेट करते. या घटनेनंतर सुमारे चाळीस वर्षांनी म्हणजे २०११ मध्ये ती आपल्या आठवणी ' व्हेन आय फेल फ्रॉम द स्काय ' या पुस्तकात शब्दबद्ध करते. तिच्या या पुस्तकाला उत्कृष्ट कलाकृतीचा पुरस्कार मिळतो. तिच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पेरूच्या सरकारतर्फे तिचा नुकताच २०१९ मध्ये सन्मान केला गेला. या तिकडच्या हिरकणीच्या जीवनावर अनेक चित्रपट आणि डॉक्युमेंटरी पण निघाल्या आहेत.
थोड्याफार संकटाने खचून जाण्याऱ्या, नैराश्यग्रस्त होणाऱ्या सर्वांसाठीच ज्यूलियनची कथा प्रेरणादायी आहे. आपले जीवन ही परमेश्वराने आपल्याला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. थोड्याशा संकटांनी खचून जाऊन आत्महत्या करण्याइतके जीवन स्वस्त नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती आपल्याला कठीणातल्या कठीण प्रसंगातून तारून नेऊ शकते हाच संदेश ज्यूलियनचे जीवन आपल्याला देते.
**(नुकत्याच प्रकाशित झालेल्या रंगसोहळा या पुस्तकातून साभार)**



## आनंदी पहाट

### प्रियजनांसोबत वेळ घालवणे गरजेचे

आधुनिक केसरी

आपल्या अंतर्मनातील आनंद हा कोणत्याही बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसतो, तो आपल्या मानसिक वृत्तीवर अवलंबून असतो; अस्सल आनंद आतून येत असतो. आनंदी राहण्यासाठी आपण सुज्ञपणे निवडत असलेल्या विविध बाबींवर ठरत असते. जेव्हा आपली बाह्य परिस्थिती चांगली असते, तेव्हा आपल्याला आनंद निवडणे सोपे होऊ शकते, परंतु ते त्याचे एकमेव कारण नसते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या सभोवतालच्या गोष्टी आपल्या मनासारख्या नसल्या तरीही आपण आनंदी राहू शकतो. आनंद हा सर्वात महत्वाचा अनुभव असतो, आपण आपल्यावर प्रेम करतो, ज्यांच्यावर आपण प्रेम करतो, जे आपल्यावर मनापासून निरपेक्षपणे प्रेम करतात; त्यांतूनच खरा आनंद मिळत राहतो. आपण जे काही प्रयत्न, काम करत असतो, त्यात आपल्याला नेहमी आनंदी राहायचे असते आणि आपले आप्तेष्ट, मित्रपरिवार, सगेसोयरे, आपल्या सभोवतालचे लोक आनंदी असावेत, असेही वाटत असते. आपल्याला बरे वाटण्यापेक्षा आपल्यामुळे अनेकांना विविध कारणांसाठी आनंदी राहता यावे, असे काहीतरी करणे जरुरीचे असते, कारण प्रत्येकालाच आपापल्या जीवनात आनंदाची गरज असते. काहीवेळा तणावपूर्ण नातेसंबंधांमुळे आपल्याला आनंद मिळतोच असे नाही, तरीही निरोगी वातावरण तसेच आश्वासक नातेसंबंध महान आणि चिरस्थायी आनंद देऊ शकतात. नातेसंबंध कौशल्यांवर लक्ष केंद्रित करणे, प्रियजनांसोबत वेळ घालवणे आणि इतर मार्गांनी हे नातेसंबंध जोपासणे आपल्याला आपल्या जीवनात आनंदाचे हे स्वरूप ठेवण्यास मदत करू शकते. इतरांना आनंदी करण्यापूर्वी स्वतःसोबत आपण आनंदी राहण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा मुख्य आणि सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे आपल्याला आपली स्वतःची किंमत कळू शकते, आपले सामाजिक संबंध आणि सामाजिक स्थान समजून घेता येते, स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनाकडे बघण्याच्या दृष्टीकोनाच्या महत्वपूर्ण बाबी आपल्याला स्पष्ट होतात.



आधुनिक केसरी

### आता कैसी वारी | संसाराची ? ||

**मौनात करावे | हरिचे चिंतन ||**
**आत्मा चिरंतन | हरिपाठी ||१||**

**देहास जडावा | सगुणाचा संग ||**
**मनास सत्संग | निर्गुणाचा ||२||**

**आता रात्रंदिन | गावू गुण वाचे ||**
**ज्ञाना-तुका नाचे | अभंगात ||३||**

**पाप-पुण्य काय | ठाव म्या पामरा ||**
**कर्माचा पसारा | विठुवरी ||४||**

**होऊनी निस्संग आलो | तुझ्या दारी ||**
**आता कैसी वारी | संसाराची ? ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥१॥**
**सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ध्रु.॥**
**हित तें करावे देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥२॥**
**तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥३॥**

जगद्गुरू संत श्री तुकोबाराय या अभंगातून उपदेश करतात की, आयुष्याचा नाश करू नका. सर्वांना तुकोबाराय दंडवतपूर्वक सांगतात की, आपले चित्त शुद्ध करा. मन एकाग्र करा आणि हितकारक असे भगवंताचे चिंतन करा. अभंगाच्या शेवटच्या चरणात जगद्गुरू संत श्री तुकोबाराय प्रतिपादन करतात की, तुम्हाला फार काय शिकवावे? भगवंताचे चिंतन हा लाभकारी व्यापार आहे. तो तुम्ही करा.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

या अभंगात जगद्गुरू संत श्री तुकोबारायांची सामान्य लोकांबद्दलची कळकळ व्यक्त होते. आपल्या अनेक अभंगात तुकोबांनी लोकांचे लक्ष याकडे वेधले आहे की, हा नरदेह प्राप्त झाल्यानंतर आपण त्यचे सार्थक केले आहे. क्षणोक्षणी आयुष्य कमी होत आहे. म्हणून भगवंताचे चिंतन आपण करावे. नामस्मरण आपण करावे. म्हणजे हा जन्म खऱ्या अर्थाने सफल होईल.

## मला कुणाचे दुःख पाहवत नाही



आधुनिक केसरी

पुष्कळ मंडळी यावीत, आलेल्याला खायला घालावे, आणि भगवंताचे नाम घ्यावे, ह्या तीन गोष्टी मला फार आवडतात. त्या जो करील त्याच्या हयातीत त्याला कधीही कमी पडणार नाही. जो माझ्या स्मरणात प्रपंच करतो, त्याच्या प्रपंचात मी आहे. माझ्या माणसाने प्रपंचात हेळसांड केलेली मला आवडायची नाही. उलट, इतरांच्यापेक्षा त्याने जास्त दक्षता दाखवली पाहिजे. कमी आहे त्याची काळजी न करता, जास्त असेल तर त्याविषयी ममत्व न ठेवता, जो येईल तसा खर्च करतो, तो मनुष्य ते सर्व मला देतो. मला विकत-श्राद्ध घ्यायची सवय आहे. मला स्वतःचा प्रपंच करता आला नाही; पण दुसऱ्याचा मात्र चांगला करता येतो. माझ्याजवळ एकही पैसा नव्हता आणि खाणारी माणसे खूप होती; पण मी कधीही काळजी केली नाही. मी आजपर्यंत पैशासाठी कुणापुढे जीभ विटाळली नाही. उद्या जर कोणी एक लाख रुपये माझ्या नकळत माझ्या उशाशी आणून ठेवले, तर मी ते विष्ठेसारखे बाजूला सारीन आणि स्वतःच्या श्रमाचे चार आणे मिळवून पोट भरीन. मला आवडते की, एक लंगोटी घालावी, मारुतीच्या देवळात राहावे, भिक्षा मागावी, आणि अखंड नाम घ्यावे. हे करायला कोण तयार आहे ? मी आपला नामाचा हट्ट कधी सोडला नाही. मी जरी जास्त गरीबांचा आहे, तरी मला प्रपंचांत कधी दैन्यपणा आवडत नाही. दुसऱ्याकरिता निःस्वार्थीपणाने भीक मागण्याची मला कधीच लाज वाटली नाही. व्यवहारदृष्ट्या माझ्यामध्ये एकच दोष आहे की, मला कुणाचे दुःख पाहवत नाही. माझ्यामध्ये प्रेमाशिवाय दुसरे काही सापडायचे नाही. माझ्यातले प्रेम काढले तर मग 'मी' नाहीच ! मला फक्त आईच्याच प्रेमाची कल्पना आहे. माझ्याकडे येणाऱ्या माणसाला माहेरी आल्यासारखे वाटले पाहिजे; तो परत जाताना त्याच्या डोळ्यांत पाणी आले पाहिजे. दुसऱ्याला आपला आधार वाटला पाहिजे. मी असून काहीच होत नाही; ज्या गोष्टी घडायच्या त्या घडतच असतात. पण आपण असण्यात एक आधार आहे असे इतरांना वाटावे. माझे आता किती दिवस आहेत कुणास ठाऊक ! मी पुढे असो वा नसो, जे मी सुरुवातीला सांगितले तेच मी शेवटीही सांगतो : तुम्ही कसेही असा पण भगवंताच्या नामाला सोडू नका. रामरायाने तुम्हा सर्वांवर कृपा करावी, ही माझी त्याला प्रार्थना आहे. तुम्ही माझ्यासाठी इतक्या आपलेपणाने कष्ट करता याची जाणीव मला आहे. या कष्टांचा मोबदला रामरायच तुम्हाला देईल. तुम्ही सर्वजण आनंदात राहा, हा माझा तुम्हा सर्वांना आशिर्वाद आहे.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## श्रावण....

आधुनिक केसरी

तिन्ही सांजेला तेलाचा दिवा, तुपाचं निरांजन लावून केलेल्या दिपपूजनानंतर प्रकाशमान होणारं घर आणि त्यांत मिसळलेले शुभंकरोतीचे सूर .. 'दिव्याची आवस'म्हणून जाड कणिक केशरी गूळ वापरून केलेले खमंग दिवे आणि त्यावर मुक्तहस्ते घातलेलं रवाळ तूप... म्हणजेच येणाऱ्या श्रावणाची चाहूल !!
डबा भर चिरलेला पिवळा धम्मक गूळ, हरभरा डाळ, भाजलेले दाणे, फुटाणे, दाण्याचं खमंग कूट, नुकतीच करून ठेवलेली वेलचीची पुड, उपासाची भाजणी राजगिरा लाडू व खजूर यांनी भरलेले डबे, म्हणजेच श्रावणाच्या स्वागतासाठी सजलेलं घरातलं स्वयंपाकघर !!
जिवतीचा फोटो, कहाण्यांच पुस्तक, स्वच्छ घासून चमकणारं पळीपंचपात्र , दिव्यांनी सजलेलं देवघर, फुलपुडीतून डोकावणाऱ्या दुर्वा आघाडा फुलं आणि सगळी मरगळ झटकून सजलेलं घर म्हणजेच श्रावणाचं आगमन !!
श्रावण म्हणजे आवर्जून करायचं पुरण, भाजणीचे वडे, नारळी भात, नारळाच्या वडया, वालाचं बिरडं, गव्हाची खीर, हारोळ्याचे लाडू, भोपळयाचे घारगे, गाकर, पुरणाची पोळी, पुरणाचे दिंड आणि दूध फुटाण्याचा नैवेद्य.. श्रावण म्हणजे वेगवेगळ्या चवींतून घरांत दरवळणारा गंध !!
श्रावण म्हणजे बहीण भावाच्या प्रेमाची राखी, आईने मुलांसाठी केलेली जिवतीची पूजा, शुक्रवारी मुलांच केलेलं पुरणाचं औक्षण, आपल्या घरासाठी सर्वांच्या आनंदासाठी



केलेली देवीची पूजा, माहेरची येणारी आठवण म्हणून आई वहीनीकडे झालेलं सौवाष्ण जेवण व मैत्रिणींबरोबर सजलेली मंगळागौर.. प्रत्येक नात्याला जपणारा हा श्रावण, अनेक रंगांची उधळण करत येणारा श्रावण !!

श्रावण म्हणजे गाभाऱ्यात उमटणारे ओंकार.. श्रावण म्हणजे समईतल्या शुभ्र प्रकाशात दिसणारं पांढऱ्या फुलांनी सजलेलं शिवलिंग, कापसाच्या वस्त्रानं, हळदी कुंकवाच्या करंड्यानं धुप अगरबत्ती दिवा आणि चंदनाने सजलेलं पूजेचं ताट, गोकर्ण जाई जुई तगर जास्वंद बेल दुर्वा पत्री तुळस यांनी सजलेली पूजेची परडी.
श्रावण म्हणजे प्राजक्ताच्या सडयाने नटलेलं आणि श्रावण सरींनी सजलेलं माझं आंगण !!
श्रावण म्हणजे हिरवा ऋतु .. या सजलेल्या निसर्गाच्या बरोबरीने सजायचे दिवस.. कांकणांची किणकीण, काचेचा चुडा, हातावरची मेंदी, जरी काठाच्या साड्या, केसांत जुईचा गजरा, पायी जोडव्यांचा आवाज, गळ्यांत मंगळसूत्राबरोबर चमकणारा सर, कानांत कुड्या आणि पायांत पैंजण.. म्हणजेच घरातही भेटणारा, सजवणारा श्रावण !!
श्रावण म्हणजे आठवणींची सर.. श्रावण म्हणजे डोळे मिटतां केवड्याच्या पानाचा पसरलेला गंध तर कधी तिच्या चाहुलीने दरवळणारा सभोवताल... श्रावण म्हणजे नेमाने देवळांत जाणाऱ्या तिची आठवण करून देणारा सण तर कधी मंगळागौर उजवताना तिला दिलेल्या वाणाची एक गोड आठवण.. श्रावण म्हणजे शुक्रवारी न चुकता तिनं केलेलं औक्षण, माहेरवाशीण म्हणून भरलेली ओटी आणि तिने आग्रहानं खावू घातलेली पुरणाची मऊसूत पोळी.. श्रावण म्हणजे देव्हाऱ्यांत समईच्या मंद प्रकाशात दिसणारं तिचं प्रसन्न रूप.. श्रावण म्हणजे आई तुझ्या आठवणींचा पाऊस!!!

# गुरुजी झाले अटक खेळताना पत्ते-जुगार : काही होत नाही हो त्यांचे नोकरी राहून अबाधीत वरतून मिळतो पगार

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** गेल्या तीन-चार (३-४) महिन्यांपासून सातत्याने बी.एम.न्यूज (BM NEWS) या चॅनलच्या माध्यमातून तर दै.आधुनिक केसरी आणि दै. सुपर भारत या राज्य दैनिकांच्या माध्यमातून जिल्हा परिषद बीड, विशेषतः शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड मधील एकंदरीत अनागोंदी कारभारावर प्रकर्षाने प्रकाश टाकण्याचे काम केले जात असताना जि.प. ला मात्र तीळमात्र फरक पडताना दिसत नाही. तर उलट जि.प.ने किळसवाण्या प्रतापाने कळस गाठत चक्क जुगारी शिक्षकांना पगारी अभय देण्यासाठी बुड ते शेंडा सारकाही संगणमताने (मॅनेज करत) कक्षाधिकारी पी.बी.आर्सुळ यांनी आपली चमक आणि धमक दाखवून पुन्हा एकदा सिद्ध केले की, मी DY.सीईओ, सीईओ व शिक्षणाधिकारी यांना खिशात ठेवून कामकाज पाहतो-करतो. मी जे बोलेलं, एखाद्या फाईलला टिपणी टाकेल. त्याचप्रमाणे भ्रष्टाचारी, व्यसनाधीन शिक्षकांना अभय मिळेल ही खात्री बाळगावी....! अनागोंदी कारभाराचे जि.प.बीड मधील बादशहा-शहंशहा सामान्य प्रशासन कक्षाअधिकारी जयलाल राजपूत यांच्या तालमीत घडलेले कक्षाधिकारी पी.बी.आरसूळ आप्पा गटशिक्षणाधिकारी, सीईओना मोजत नाहीत हे पण ऐक आश्चर्यच......!

**शिक्षकांनो भिऊ नकात मी तुमच्या पाठीशी आहे.....!**

गेल्या चार-पाच वर्षांपासून शासनाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व विद्यार्थी भावी आयुष्यात व्यसनापासून दूर राहावेत म्हणून शासन शिक्षकांमार्फत शाळा पातळीवर व्यसनमुक्तीचे धडे गुरुजनांच्या मार्फत देत आहे. परंतु या सुंदर योजनेचा बीड जि.प. मध्ये पूर्णपणे माहे मे-जून मध्ये काही पुढारी शिक्षक शाळा व विद्यार्थी यांना वाऱ्यावर सोडून नामांकित अशा जुगार अड्ड्यावर पत्ते खेळताना पोलिसांना विशेषतः खमके दबंग अधिकारी पंकज कुमावत यांच्या पथकाच्या तावडीत सापडले. सापडलेल्या जुगारींमध्ये बीड जि.प. मधील शिक्षक जायमोक्यावर आढळून आले. म्हणून सदरील शिक्षकांना पोलिसांनी अटक केली. कायम पैशाची चटक लागलेली ही लाचखोर मंडळी अटक होताच यांचे जुळवाजुळीवीचे नाटक सुरू झाले. पण अशा नाटकांना फाटक देणारे काटक अधिकारी पंकज कुमार यांनी आपले काम चोख बजावत गुन्हा दाखल केल्याने या महाशयांना न्यायालयासमोर हजर केले असता संबंधितांना जामीन मंजूर झाला. या प्रकारच्या बातम्या निरनिराळ्या वर्तमानपत्रातून जि.प. प्रशासनापर्यंत पोहोचल्यामुळे व जि.प. प्रशासनाची शिक्षण खात्याची बदनामी झाल्यामुळे खाते प्रमुख दबंग शिक्षणाधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांनी या महाशयांची तात्काळ चौकशी करून हे प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अजित पवार यांच्याकडे वर्ग केले. सर्व प्रकरणाची शहानिशा करून कर्तव्यदक्ष आणि खमके अधिकारी म्हणून नावलौकिक मिळून असलेले सीईओ अजित पवार यांनी शिक्षकांना कायद्याच्या चौकटीनुसार तथा शासन निर्णयानुसार तात्काळ निलंबित केले. सीईओ यांनी खरोखरच जुगारी शिक्षकांना निलंबित करून शासन स्तरावरून सुरू असणाऱ्या योजनेला बळकटी देण्याचा शंभर टक्के (१००%) प्रयत्न केला. त्याबद्दल त्यांचे व शिक्षणाधिकारी कुलकर्णी यांचे जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात कौतुक होताना दिसून आले. पण हे कौतुक कक्षाधिकारी पी.बी.आरसुळ आप्पा यांनी जास्त दिवस टिकू दिले नाही. निलंबित झालेल्या शिक्षकांनी आपले निलंबन कसे गैर आहे. असा कांगावा सुरू केला. एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही कशी चुकीची आहे हे सिद्ध करण्यासाठी जुगारी शिक्षकांनी कंबर कसताच जि.प. मध्ये निरडावलेले लाचखोर कर्मचारी सदरील शिक्षकांना आपल्या वरिष्ठाला डावलून साथ देण्यास तयार झाले.






**शिक्षकांनो भिऊ नकात आम्ही तुमच्या पाठीशी आहोत....!**

याप्रमाणे तुम्ही फक्त गाठीशी गतुडे बांधून तयार राहा. पुढचं आम्ही सारे भाऊ-भाऊ बघून घेऊ....! या धरतीवर यांच्या साथीला मंत्रालय व मंत्रालयातील एक राज्यमंत्री जे नुकतेच पायउतार झालेल्या सरकार मधे पायउतार झाले. ते व त्यांचे अप्पर सचिव कसे या प्रकरणात सामील झाले हे क्रमशः उद्याच्या अंकात वाचा..........!!

**(क्रमशः भाग-2 पुढील अंकात)**

## औराळा येथे ग्रामसभेत विविध ठराव मंजूर




आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत कन्नड तालुक्यातील औराळा ग्रामपंचायतमध्ये झालेल्या ग्रामसभेत १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रत्येक घरावर तिरंगा झेंडा लावून देशाप्रती आपले प्रेम व्यक्त करण्याचा तसेच कोरोना लसीकरणासाठी बूस्टर डोसचे जनजागृती करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सर्वांना जल जीवन मिशन अंतर्गत शुद्ध पेयजल मिळण्याबाबत चर्चा करण्यात आली, अध्यक्षस्थानी सरपंच सोनाली सुरेश बागुल होत्या.

यावर्षी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातखाली देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. या वर्षातील प्रत्येक क्षण नवीन पिढीसाठी देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा असून औराळा ग्रामपंचायत च्या वतीने १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा कार्यक्रम यशस्वी आयोजन करावे असे आवाहन ग्रामसेवक सुजाता गवई यांनी ग्रामसभेत ठराव मंजूर करताना केला आहे.

यावेळी सरपंच सोनाली सुरेश बागुल, उपसरपंच आकाश पगारे, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र भारतीय, दिशांत जिवरख, देविदास राठोड, प्रभाकर निकम, विठ्ठल गुजराणे, प्रशांत पगारे, गणेश कुदळे, चंद्रकांत बागुल, विलास पगारे, गजानन जिवरख, गणेश अंगुणे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

**आज ग्रामपंचायत च्या वतीने हर घर तिरंगा झेंडा मोहीम ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून देशाभरात हर घर तिरंगा झेंडा मोहीम देशाभरात राबवण्यात येणार आहे आम्ही १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान सर्व गावांमध्ये घर घर तिरंगा झेंडा मोहीम व बूस्टर डोसचे लसीकरण औराळा ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात येणार आहे.**

**राजेंद्र भारतीय**
**ग्रामपंचायत सदस्य औराळा**

## मोकाट गुरे मालकावर होणार कारवाई

### आयुक्तांनी घेतली आधुनिक केसरीची दखल..!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळ्यात मोकाट गुरांचा हैदोस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष अशाप्रकारे दैनिक आधुनिक केसरी वृत्तपत्रामध्ये देण्यात आली होती. त्याची दखल ताबडतोब आयुक्तांनी घेतली. धुळे शहरातील मोकाट गुरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे शहरातील १२० गुरे मालकांना १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यानुसार २४ तासाच्या आत संबधितांनी गुरे ताब्यात घ्यावीत, अन्यथा २४ तासानंतर मालकांवर गुन्हे दाखलची कारवाई केली जाणार असल्याचा इशारा आयुक्त देविदास टेकाळे यांनी दिला आहे.



धुळ्यात मोकाट गुरांचा हैदोस; महापालिका प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

धुळे : शहरात मोकाट जनावरांनी हैदोस घातला असून यामुळे वाहन चालकांसह विक्रेत्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुख्य रस्त्यावरच या मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला असून अपघाताची टांगती तलवार वाहन चालकांना दिसून येत आहे. या समस्यांबाबत वारंवार तक्रार करूनही धुळे महापालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची व्यथाही धुळेकर नागरिकांनी आधुनिक केसरी वार्ताहरांसमोर मांडली आहे. धुळे शहरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरांच्या कळपाने थैमान घातला आहे. काही रस्त्यावर अचानकपणे ही मोकाट जनावरे रस्ता ओलांडत असताना छोटे-मोठे अपघात झाल्याचे पाहवयास मिळत आहे. त्यामुळे ही समस्या वाहनधारकांसाठीही डोकेदुखी ठरत आहे. तर भाजीपाला विक्रेत्यांनाही मोकाट जनावरांचा त्रास सहन करावा लागत आहे. तर अबालवृद्धांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. धुळे महापालिका प्रशासनाला या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदने देऊन पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र, महापालिका प्रशासनाच्यावतीने थातूरमातूर कारवाई केली गेल्यानंतर परिस्थिती जशीच्या तशी दिसून येत आहे. त्यामुळे धुळेकरांसाठी ही समस्या नित्याचीच झाली आहे. तर महापालिका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची व्यथा ही धुळेकर नागरिकांनी अधुनिक केसरी च्या वार्ताहरांसमोर मांडली आहे.

महापालिका क्षेत्रातील विविध अडचणी व समस्यांसंदर्भात आयुक्त टेकाळे यांनी विभाग प्रमुखांची बैठक बोलवली होती. त्यावेळी मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरी क्षेत्रामध्ये गुरे पाळणे व त्यांची ने-आण करणे अधिनियमन १९७६ नुसार गुरे मालकांनी याबाबत दक्षता न घेतल्यास अपराध व शास्तीच्या तरतुदीनुसार गुन्हे दाखल करणे व आर्थिक दंड वसूल करण्याची कारवाई केली जाणार आहे. यात संबंधित व्यक्तीवर अपराध सिध्दीनंतर ३ वर्षापर्यंत कारावास व दंड अशी शिक्षा प्रस्तावित आहे. तसेच मोकाट जनावरांना हलवून गुरे मालकांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.



## रस्त्याच्या दुर्दशेकडे शासन, प्रशासनाने फिरवली पाठ !

### लोकवर्गणी व श्रमदानातून काम करत ग्रामस्थांची झाली अभिमानाने मान ताठ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** निमगुळ फाटा ते गावापर्यंतच्या रस्त्याची अतिशय दुर्दशा झाली आहे. यामुळे वाहनधारकांचे अतिशय हाल होत आहे. संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करूनदेखील प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने आता लोगवर्गणीतून रस्ता दुरुस्त करण्याचा निर्णय गावातील युवा वर्गाने केला आहे. एकत्रित येत श्रमदानातून ग्रामस्थांनी रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवातही केली आहे.

धुळे तालुक्यातील निमगूळ हे गाव धुळे आणि जळगाव तालुक्यातील जिल्ह्याच्या सीमेवर आहे. गावात जाण्यासाठी निमगुळ फाटापासून एकमेव मार्ग आहे. तो जवळजवळ २-३ वर्षांपासून अतिशय खराब आहे. या रस्त्याने दुचाकी वाहन चालवणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. वेळोवेळी संबंधितांकडे तक्रारी करूनदेखील कोणत्याही प्रकारे लक्ष दिले जात नाही. सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी गावातील नागरिक दिपक पाटील यांनी आपले सरकार या पोर्टलवर तक्रार दाखल केली होती. सदर माहिती मिळाली की रस्त्याची स्थिती खूपच खराब असून त्यासाठी ४५ लाख रुपयांची मंजुरीसाठी काम बाकी आहे. पैसे मंजूर झाल्यावर काम सुरू होईल. मात्र आज रस्ता एवढा खराब आहे की, केव्हा कुणाची गाडी घसरेल आणि अपघात होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे लोकवर्गणी करून आणि श्रमदान करून २६ जुलैपासून रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्याचा संकल्प तरूणांनी केला आहे.



# शेतकऱ्यांवर राजकीय आपत्ती

आधुनिक केसरी

विदर्भ आणि मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे सुमारे साडेआठ लाख हेक्टर क्षेत्रावरील खरिपातील कोवळी पिके, फळबागा व भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. महापुराच्या पाण्याने चार हजार हेक्टर शेतजमीन खरडून गेली आहे. पंचनामे अद्यापही सुरू आहेत. आगामी काळातही पावसाचा अंदाज असल्याने नुकसानीचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे. सरकारने अद्याप मदत जाहीर केलेली नाही. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून (एसडीआरएफ) मिळणारी मदत अपुरी आहे. काही भागात दुबार पेरणीही शक्य नाही, अशा स्थितीतून शेतकरी सावरणार कसा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विदर्भात अतिवृष्टी व महापुरामुळे ५ लाख ७० हजार हेक्टरवरील शेती, माती व पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक भागात प्रमुख पिके चिखलात रुतली. मराठवाड्यातील ४५० पैकी १८२ मंडळांत अतिवृष्टीमुळे नुकसानीचे प्रमाणही ३ लाख ७८ हजार हेक्टरवर जाऊन पोहोचले आहे. ३ हजार ७९३ हेक्टर शेतीतील सुपीक माती अक्षरश: खरडून गेली आहे. याशिवाय शेतांमध्ये पाणी साचून राहिल्यास आगामी काळात शेतकऱ्यांना आणखी नुकसान सोसावे लागेल. पुन्हा पेरणी करावी लागल्यास उत्पादनाचा खर्चही वाढणार आहे. आधीच निसर्गाचा लहरीपणा, वाढत्या महागाईमुळे वाढता उत्पादन खर्च व शेतीमालाला हमीभावाचा अभाव या कारणांमुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणींत सापडलेला आहे. प्रत्यक्ष बाधित लोकांना मदत पुरवण्यासह आपत्ती व्यवस्थापनाची प्राथमिक जबाबदारी ही संबंधित राज्य सरकारांची असते. राज्य सरकार अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारच्या मंजूर बाबी आणि नियमांनुसार, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून मदत पुरवण्यासंबंधित उपाययोजना केली जाते. गंभीर स्वरूपाच्या आपत्तीच्या वेळी निर्धारित प्रक्रियेनुसार, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून अतिरिक्त आर्थिक सहाय्य प्रदान केले जाते, ज्याचे मूल्यांकन आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथकाच्या भेटीच्या आधारे केले जाते. एसडीआरएफच्या निकषावर केवळ ८ हजार ८०० रुपये प्रतिहेक्टर मदत मिळू शकते. ही मदत अत्यंत तोकडी असल्याचा आक्षेप घेतला जातो. शेतीसाठी लागणारा उत्पादन खर्च व त्यातून मिळणारे उत्पन्न याचा सर्वसामान्य शेतकऱ्यांना अद्यापही ताळमेळ लागत नाही. त्यातच वाढती महागाई, शेतमजुरांची कमतरता, कुटुंबांचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण व मुलींच्या लग्नासाठी करावा लागणारा खर्च आदी कारणांमुळे शेतकरी आयुष्यभर कर्जाच्या विळख्यात सापडलेला असतो. तरीही आज ना उद्या आपल्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी होईल, या आशेवर शेतात रात्रंदिवस राबत असतो. कृषिप्रधान असलेल्या देशात केंद्र व राज्य शासनाने संयुक्तपणे शेती विकासाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या कष्टाला महत्त्व देण्याची तसेच शेती व्यवसायाला ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्याची गरज आहे. पर्यायाने कृषी क्षेत्राला चांगले दिवस येऊन शेतकरी आत्महत्येला पूर्णविराम मिळू शकेल.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# गुजरातमधील दारूबंदीवर प्रश्नचिन्ह

आधुनिक केसरी

**गुजरातमधील बोताड जिल्ह्यात बनावट दारूमुळे 33 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली. राज्य सरकारने दारूबंदी लागू केली असली तरी ती केवळ कागदावरच असल्याचे ही वेदनादायी घटना सांगत आहे. अशा स्थितीत दारूबंदीसारख्या उपाययोजना आणि कायद्याला काय अर्थ राहतो? साहजिकच, हे सर्व केवळ दिखाव्यासाठी आहे आणि सत्य हे आहे की बनावट दारूचा सुळसुळाट आहे आणि त्याने लोक मरत आहेत. बोताड जिल्ह्यातील या घटनेने पुन्हा एकदा शासन आणि पोलीस प्रशासनाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. कारण भूतकाळात अशा घटना ज्या ज्या वेळी घडल्या, त्यामधून कोणताही धडा घेतला गेला नाही.**



गुजरातमधील बोताड जिल्ह्यात बनावट दारूमुळे 33 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दारूबंदी असतानाही राज्यात बनावट दारूचा धंदा बिनबोभाट सुरू असल्याचा पुरावा ही घटना देते. या प्रकरणी खून व अन्य गुन्ह्यांसाठी चौदा जणांवर गुन्हा दाखल करून काही जणांना अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. पोलीस हे आपले मोठे यश मानत असले तरी तेच आता या सर्वाधिक प्रश्नांच्या गर्तेत अडकले आहेत. पोलीस आतापर्यंत झोपले होते का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

प्रकृती बिघडू लागल्याने बोटादच्या रोजीद आणि आसपासच्या गावांतील लोक एकापाठोपाठ बारवेला व बोटाद येथील सरकारी रुग्णालयांत दाखल होऊ लागल्यानंतर सोमवारी सकाळी हे प्रकरण उजेडात आले. विषारी दारू पिल्यामुळे आतापर्यंत 33 जणांचा मृत्यू झाला आहे. त्यातील 22 जण हे बोटाद जिल्ह्यातील विविध गावचे रहिवासी असून, सहाजण लगतच्या अहमदाबाद जिल्ह्यातील धनधुका तालुक्यातील आहेत. याशिवाय भावनगर, बोटाद व अहमदाबाद येथील रुग्णालयांत सध्या 50 हून अधिक लोकांवर उपचार सुरू आहेत.

गुजरातमध्ये हातभट्टीचालकांना धाडींमुळे गावठी दारू तयार करणे कठीण झाले आहे. त्यामुळे ते अशा रसायनांत पाणी मिसळून त्यांची गावठी दारू म्हणून विक्री करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. अहमदाबाद येथील एका गोदामात व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या एका इसमाने त्याच गोदामातून 600 लिटर मिथेल अल्कोहोल चोरून ते बोटाद येथील त्याचा नातेवाईक संजय याला 40 हजार रुपयांत विकले होते. हे औद्योगिक विद्रावक (दुसरा पदार्थ स्वतःमध्ये विरघळवून घेणारा) आहे हे माहीत असूनही या इसमाने हे रसायन अवैध दारू विक्रेत्यांना विकले. या विक्रेत्यांनी नंतर त्यात पाणी मिसळून त्याचे पाऊच तयार केले आणि गावठी दारू म्हणून त्यांची रोजीद, रानपरी, चंदारवा, देवगणा, चोकडी या गावांसह बोटाद जिल्ह्यातील अन्य गावच्या ग्रामस्थांना विक्री केली, असे तपासात समोर आले.

राज्य सरकारने दारूबंदी लागू केली असली तरी ती केवळ कागदावरच असल्याचे ही वेदनादायी घटना सांगत आहे. अशा स्थितीत दारूबंदीसारख्या उपाययोजना आणि कायद्याला काय अर्थ राहतो? साहजिकच, हे सर्व केवळ दिखाव्यासाठी आहे आणि सत्य हे आहे की बनावट दारूचा सुळसुळाट आहे आणि त्याने लोक मरत आहेत. बोताड जिल्ह्यातील या घटनेने पुन्हा एकदा शासन आणि पोलीस प्रशासनाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. कारण भूतकाळात अशा घटना ज्या ज्या वेळी घडल्या, त्यामधून कोणताही धडा घेतला गेला नाही. या जिल्ह्यातील रोजीड गावात बनावट दारू बनविण्याचे काम सुरू असल्याचे पोलीस सांगत आहेत. त्यासाठी अहमदाबाद येथून मिथाईल अल्कोहोल आणण्यात आले होते. मात्र आश्चर्याची बाब म्हणजे आजपर्यंत पोलिसांना याची माहितीही नव्हती! यावरून राज्याचे पोलिस कसे काम करत आहेत हे दिसून येते. त्यांची गुप्तचर यंत्रणा किती कुचकामी आहे, त्यांना जिल्ह्यांपासून खेड्यापाड्यापर्यंत काय चालले आहे हेही कळत नाही. अवैध दारूचा धंदा फक्त एकाच गावात सुरू असेल असे नाही! ही घटना घडली नसती तर हा धंदा असाच बिनबोभाट सुरू राहिला असता. ही घटना घडलेल्या गावाच्या सरपंचानेही गावात सुरू असलेल्या अवैध दारू धंद्याबाबत पोलिसांकडे तक्रार केली होती, हे आता उघड झाले आहे. मात्र पोलिसांनी त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून धमकावले होते. वास्तविक पोलीस आणि दारू माफिया यांच्या संगनमताशिवाय असे अवैध धंदे चालू शकत नाहीत. जुलै 2009 मध्येही गुजरातमध्ये अशीच दुर्दैवी घटना घडली होती. अहमदाबादमध्ये घडलेल्या घटनेत बनावट दारूमुळे एकशे तीसहून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. तसेच 1989 मध्ये राज्यातील वडोदरा शहरात बनावट दारूमुळे 132 जणांचा मृत्यू झाला होता. छोट्या छोट्या घटनांची तर गिणतीच नाही. बरीच प्रकरणे तर उघडही होत नाहीत. पण इतके मोठे विषारी दारू घोटाळे होऊनही सरकार जर असे अवैध धंदे बंद करू शकत नसेल तर याला घोर अपयश, लाचारी आणि निर्लज्जपणा याहून अधिक काय म्हणावे, असा प्रश्न आहे. माफिया व अवैध धंदेवाल्यांना राजकीय व पोलीसांचे संरक्षण मिळते, असा आरोप केला तर तो अनावश्यक वाटत नाही. जेव्हा-जेव्हा अशा मोठ्या घटना घडल्या, तेव्हा विशेष तपास पथकापासून ते मोठे चौकशी आयोगही तयार झाले. सर्वांनी आपला अहवालही दिला. पण पुढे त्यात गांभीर्याने काम झालेले दिसत नाही. अन्यथा दारू माफिया आणि पोलिसांचे संगनमत टिकले नसते आणि भविष्यात अशा दुःखद घटना पुन्हा घडल्या नसत्या. मात्र त्यामुळे बोताड जिल्ह्यातील या घटनेने 'गुजरात मॉडेल'वर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल गुजरात दौऱ्यावर गेले होते. गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात विषारी दारू विकली जात आहे. बंदी कुठे आहे, असा सवाल त्यांनी केला आहे. विषारी दारू विकणाऱ्यांना राजकीय संरक्षण असल्याचा आरोप करून त्यांनी विषारी दारूच्या विक्रीतून मिळणारा पैसा जातो कुठे याचा तपास करण्याची मागणी केली आहे.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# विधान परिषद : राज्यातील जनतेवर लादलेले ओझे

आधुनिक केसरी

**कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावरी अशी परिस्थिती राजकीय वर्तुळात दिसून येते. देशात 28 राज्ये व 8 केंद्र शासित प्रदेश आहेत. यात फक्त 6 राज्यांत विधानपरिषद सदस्य आहेत. त्यामुळे याठिकाणी विधान परिषद दिसून येते. यामुळे या सहा राज्यांचे राजकीय पुढाऱ्यांचे ओझे सर्वसामान्यांनवर त्या-त्या राज्यांनी लादल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे या 6 राज्यांतील विधान परिषद पुर्णतः बरखास्त करायला हवी. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, बिहार, उत्तरप्रदेश याच राज्यांत विधान परिषद सदस्य का? असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत असतो. आपण अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहोत. त्यामुळे विधानपरिषद सदस्य ही सुरू असलेली 6 राज्यातील परंपरा ताबडतोब संपुष्टात यायला पाहिजे.**

विधान परिषदेसाठी वेगळे सभागृह हे राज्यावर व राज्याच्या जनतेवर लादलेले जास्तीचे ओझे नाही का? यामुळे विकासात आर्थिक अडचण निर्माण होत नाही का? कारण विधान परिषद म्हणजे राज्याच्या दृष्टीकोनातून जनतेवर लादलेले मोठे ओझेच म्हणावे लागेल. महाराष्ट्रात तब्बल 78 विधानपरिषद सदस्य असतात. यांना पगार, पेंशन, इतर भत्ते किंवा इतर खर्च यात राज्याचे करोडो रुपये पाण्यात जात आहे.कारण राज्याचा कारभार पहाण्यासाठी राज्याच्या जनतेने निवडून दिलेले 288 सदस्य पूर्णपने समर्थ आहेत मग विधान परिषद सदस्य कशाला? कारण राज्याच्या विकासासाठी शहरापासून तर गावखेड्यापर्यंत ग्रामपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद इत्यादी अनेक क्षेत्रातील सदस्य व सरकारी यंत्रणा सुसज्जीत असते आणि आपआपल्या क्षेत्रात कार्यरत असतात. यांच्या मदतीला राज्याचे 288 विधानसभा सदस्य (आमदार) व 48 लोकसभा सदस्य (खासदार) असतात. एवढा मोठा राजकीय फौजफाटा असताना 78 विधानपरिषद सदस्यची (आमदारांची) आवश्यकता का? राज्याची 12 कोटी 94 लाख जनता विधानसभा सदस्य व खासदार यांचे कार्य व महत्त्व चांगल्या प्रकारे समजू शकतात.परंतु विधान परिषद सदस्यांची आवश्यकता नसताना त्यांना लोकप्रतिनिधीचा मान देने उचीत नसल्याचे मला वाटते. कारण राज्याच्या 12 कोटी 94 लोकांनी आपल्या उघड्या डोळ्यांनी पहावे की विधान परिषद निवडणुकीत घोडेबाजार मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. माझ्यामते राज्याच्या विकासासाठी राज्याचे 288 आमदार व 48 खासदार समर्थ आहेत आणि हेच खरे लोकप्रतिनिधी आणि जनप्रतिनिधी आहेत. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य होवून होत असलेली 75 वर्षे व अमृतमहोत्सवी वर्ष लक्षात घेता विधान परिषद पूर्णतः बरखास्त करून राज्याचा कारभार फक्त लोकांमधून निवडणूक गेलेल्या लोकप्रतिनिधींनाच असायला हवा. देशातील 22 राज्य बिनाविधान परिषदेने राज्यकारभार पाहू शकतात, चालवू शकतात व विकास करू शकतात मग महाराष्ट्रासह देशातील उत्तरप्रदेश, तेलंगणा, बिहार, आंध्रप्रदेश, कर्नाटक हे 6 राज्य जनतेच्या लोकप्रतिनिधींकडून का चालवू शकत नाही? देशातील 28 राज्यांपैकी फक्त 6 राज्यात विधान परिषद अस्तित्वात आहे हे आश्चर्यच म्हणावे लागेल. विधानपरिष जर पाहिजे होती तर सर्वच राज्यांमध्ये हवी होती. त्यामुळे देशातील 6 राज्यातील विधान परिषदेचा होणारा संपूर्ण खर्च अवाजवी असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे केंद्र सरकारला आग्रह करतो की देशातील समान हक्क समान कायदा अंतर्गत 6 राज्यातील विधानपरिषद पध्दती ताबडतोब बरखास्त करावी व राज्याची संपूर्ण धुरा लोकप्रतिनिधी आणि जनप्रतिनिधी यांच्या स्वाधीन करावी. तेव्हाच देशातील 28 राज्यात समानता दिसून येईल.जम्मु काश्मीर या राज्यात विधानपरिषद कार्यरत होती. परंतु घटनेच्या 370 व्या कलमानुसार असलेले विशेषाधिकार रद्द करण्यात आले आणि राज्याला केंद्रशासित दर्जा बहाल करण्यात आला. यानंतर जम्मू



काश्मीरमधील विधान परिषदेचे अस्तित्व संपुष्टात आले. देशात पश्चिम बंगाल, पंजाब, तामिळनाडू, जम्मू काश्मीर या राज्यात विधान परिषद होती. परंतु याची गरज नसल्याचे लक्षात आल्याने कालांतराने विधान परिषद बरखास्त करण्यात आली. यात पश्चिम बंगाल (1969), पंजाब (1970), तामिळनाडू (1968), जम्मू काश्मीर (2019) येथील विधानपरिषद बरखास्त करण्यात आली. आसाम राज्यात स्वातंत्र्यापूर्वी विधान परिषद होती. परंतु स्वतंत्र मिळाल्यानंतर (1947) ला ती बरखास्त करण्यात आली.

महाराष्ट्रात विधान परिषद 1937 मध्ये अस्तित्वात आली. परंतु महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर विधान परिषद कधीच बरखास्त झाली नाही किंवा तसा ठरावही विधानसभेत करण्यात आलेला नाही. परंतु आज महाराष्ट्रातील विधान परिषदेला स्थापन होऊन 85 वर्षे होत आहे तरी तीला बरखास्त केले नाही हे आश्चर्यच म्हणावे लागेल. सध्या राज्याला विधान परिषदेची मुळातच गरज नाही असे मला वाटते. महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील 6 राज्यातील संपूर्ण विधान परिषद बरखास्त करण्याची वेळ आलेली आहे. 1/3 सदस्य विधानसभेच्या सदस्यांकडून,1/3 सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांकडून, 1/12 शिक्षक मतदार संघातून, 1/12 सदस्य पदवीधर मतदार संघातून, 1/6 सदस्य राज्यपालांकडून अशा पध्दतीने विधानपरिषद सदस्यांची निवड केली जाते. अशाप्रकारे एकुण 78 सदस्यांची निवड विधान परिषदेसाठी करण्यात येते. माझ्या माहितीनुसार राज्याला विधान परिषदेची आवश्यकता नाहीच. याकरीता शिंदे-भाजप सरकारने महाराष्ट्र विधान परिषद बरखास्त करण्याचा निर्णय घ्यावा व तसा प्रस्ताव केंद्राकडे पाठवावा. कारण घटनेतील कलम 169 व्या तरतूदीनुसार विधान परिषद बरखास्त करण्याकरिता संसदेची मान्यता आवश्यक असते. त्यामुळे राज्य सरकारने विधानपरिषद बरखास्तीचा प्रस्ताव ताबडतोब केंद्राकडे पाठवायला हवा व विधान परिषद संपुष्टात आणायला हवी. असे जर झाले तर अमृतमहोत्सवी वर्षातील हा ऐतिहासिक निर्णय समजल्या जाईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# तिथे प्राण्यांचं राज्य असेल...



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**शिकले सवरलेली तरुण पिढी जेव्हा पुढे येईल आणि शेती करेल. तेव्हाच शेतीची भरभराट होईल. त्याचबरोबर देशाचीही. शेतकरी आत्महत्या कायमच्या बंद होतील. नाहीतर थोडेसे शिकून आम्ही शिकलो असे जर तरुणाई मानायला लागली आणि आम्ही शिकलेली माणसं का बरं शेती करावी. शेती करणं हे निरक्षरांचं काम असं जर तरुणाई मानायला लागली तर तो दिवस दूर नाही की संबंध देशात आत्महत्येचे सत्र सुरु होईल व संबंध देशातील शेतकरीच आत्महत्या करायला लागतील. मग कोणीही शेती करणार नाही आणि शेतीत कोणीही खपणार नाही. संपूर्ण देशातील जमीन ओसाड आणि जंगलानं वेष्ठीलेली असेल. जिथे प्राण्यांचं राज्य असेल. माणसांचं नसेल. ही शक्यता नाकारता येत नाही.**

शेती आपली माय आहे. त्या शेतीवर आपण आईगत प्रेम करायला हवं. जेव्हा आपण असं आईगत प्रेम शेतीवर करु. तेव्हा ही शेती आपल्याला भरभरुन देईल. हे तेवढंच खरं आहे. आज शेतीवर प्रेम करणारे कमी झालेत. कारण अलिकडे लोकं सर्रासपणे शेती विकतात. कोणी शेती पीकत नाही म्हणून, कोणी शेतीचे पैसे जास्त येतात म्हणून, तर कोणी नोकरी लागत आहे म्हणून. परंतु हा विचार कोणीही करीत नाही की शेती आपली माय आहे. जसा आपण आपल्या आईचा सौदा करु शकत नाही. तसा शेतीचाही सौदा कोणीही करु नये. शेती करणे पुर्वापार चालत आलेली परंपरा. अलिकडे लोकं रिकामटेकडे फिरतील. या पानठेल्यावर त्या पानठेल्यावर कधी या चौकात तर कधी त्या चौकात. दिवसभर कॅरमबोर्डवर बोटाच्या हालचाली करीत सगळी तरुणाई दिसते. खेड्यात दिवसभर हेच चित्र दिसतं.

आजची ग्रामीण भागातील तरुणाई शिक्षणानं वाया गेलेली दिसून येत आहे. ती चार-दोन वर्ग का जास्त शिकली की अंगात आल्यागत करीत असून त्या तरुणाईला निव्वळ हुंडडणं, कॅरम खेळणं आवडतं. कोण करेल शेती? असा भाव या तरुणाईच्या अंतर्मनात असतो. यापेक्षा नोकरी बरी असं समजून बाप मेला की ही तरुणाई बापाच्या इस्टेटीला पार विकून टाकून ती शहरात येते. मग शहरात मिळेल त्या वेठबिगारकीच्या कामाला लागून आपलं जीवन उद्ध्वस्त करीत असते. कामंही कोणते तर ज्या कामात आपल्याला इज्जत नाही.

खरंच शेती आपली माय आहे. कारण ती आपल्याला पोसते. आपलं पालन करते. परंतू तिची निगा घेतली तर ती आपल्या आईप्रमाणे असते. आपली आई... आपण आपल्या आईची काळजी घेतो ना. तिची सेवा करतो ना. तिला कधी दुखलं खुपलं तर दवाखान्यात नेतो ना. ती बेडवर असताना तिची मालिश करून देतो ना की तिलाही त्या दुखल्या खुपल्या अवस्थेत ठेवतो. तसंच नाही ठेवत ना. आईला त्रास देतो का आपण? याचं उत्तर नाही असंच येईल. तसंच शेतीचं आहे. शेतावर तण झालं की ते काढायला हवं की नाही अर्थात तिला स्वच्छ ठेवायला हवं की नाही. ज्याप्रमाणे आई म्हातारी होते. उठू बसू शकत नाही. तेव्हा तिची अंघोळ करुन देतो ना आपण तशी. तसंच शेतीचं करायचं असतं. तसेच वर्षा-दोनवर्षातून शेतीची फेरफार करावी लागते. याचाच अर्थ असा की ट्रॅक्टरनं किंवा नांगरानं खालची माती वर काढावी लागते. जसे आपण कपडे धुतो तसे.

ज्या म्हातारपणी वा तरुणपणीही आपण जशी आईची सेवा करतो. मग आई आपल्याला भरभरुन आशिर्वाद देते. अगदी तसाच आशिर्वाद आपण शेतीची सेवा केल्यास ती देत असते. शेतीची उत्तम मशागत केल्यास अर्थात शेतमाऊलीची उत्तम सेवा केल्यास शेतमाऊली आपल्याला भरभरुन पीकांच्या रुपानं आशिर्वादच देत असते. शेती आपलं जीवन आहे. ती भरभरुन पिकली तर संपूर्ण मानवजात सुखी होईल नाहीतर नाही होणार ही सत्यता आहे. ही सत्यता नाकारता येत नाही.

महत्वाचं म्हणजे शेती आपली माय आहे. त्या शेतीवर आपण आपल्या आईगत प्रेम करायला हवं. जेव्हा आपण आपल्याा आईगत शेतीवर प्रेम करु. तेव्हा ही शेती आपल्याला भरभरुन देईल हेही तेवढंच खरं आहे. परंतू आजची तरुणाई त्या गोष्टीला न ओळखता काहीच वर्ग शिकून अर्ध्या हळंकुंडात पिवळे झाल्यागत वागत असते. शेती विकते. मग त्या तरुणाईची अवस्था शेती गेल्यावर 'धोबी का कुत्ता, न घर का न घाट का' अशी होते. मुळात तरुणांनीच शेती करायला हवी. खासकरुन शिकल्या सवरल्या लोकांनी. तेव्हाच खरं तंत्रज्ञान शेतीत पोहोचेल. कारण ते मोबाईलच्या माध्यमातून नवनवीन प्रयोग शेतीत करुन शेतीचं उत्पन्न वाढवू शकतात व देशातील शेती विकसीत करुन देशाला उच्च स्थानावर पोहोचवू शकतात.

# राष्ट्रप्रेमी गुरुकृपा



देवेंद्र भुजबळ
संपर्क क्र. 9869484800.

आधुनिक केसरी

**नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेमाची आणि स्वतःच्या कर्तव्यांची भावना निर्माण व्हावी,ती सतत वाढती रहावी या मुख्य उद्देशाने १९९४ मध्ये, गुढीपाडव्याला गुरुकृपा संस्थेची स्थापना झाली. तेव्हापासून अखंडपणे गुरुकृपा कार्य करीत आहे. वयाच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये व्यक्तीची वेगवेगळी गरज असते. सोबतच व्यक्तीने आपले जीवन निसर्गाला पूरक अशा पद्धतीने जगणे आवश्यक असते. याचा तपशीलवार विचार करूनच गुरुकृपा संस्थेच्या कार्याची रूपरेषा ठरविण्यात आली आहे.**

गुरुकृपा संस्था चालवत असलेल्या समाजोपयोगी प्रकल्पांमागे सुसंस्कृत बाल, सशक्त युवा, समाधानी वृद्ध, निरोगी मानव, मजबूत मन, एकसंध समाज आणि समृद्ध पर्यावरण ही सप्तसूत्री आहे. त्याला अनुसरूनच, संस्थेचे अध्यक्ष श्री पंकजनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची निश्चित दिशेने वाटचाल सुरू आहे. नाथमहाराज यांचा जगातल्या प्रमुख धर्मांविषयी गाढा व्यासंग आहे. सामाजिक सुधारणांविषयी त्यांचा सखोल अभ्यास आहे . आधुनिक विज्ञान आणि आध्यात्मिक ज्ञान यांची डोळस समीक्षा करून, त्यापैकी सर्वसामान्य माणसाच्या आयुष्याला काय उपयुक्त आहे, याचा विचार ते सतत करतात. जनसामान्यांच्या कल्याणासाठी, त्यांना कमीत कमी वेळ, पैसा आणि शक्ती खर्च करून ह्या साऱ्याचा कसा उपयोग करून घेता येईल , याविषयी संशोधन करतात. अगदी लहान वयापासूनच मुलांवर चांगले संस्कार व्हावेत आणि त्यांना सुजाण नागरिकत्वाचे बाळकडू लाभावे, यासाठी गुरुकृपा संस्था पुढीलप्रमाणे उपक्रम राबवित असते.

## सुभाषा अभियान

आजची बरीच कोवळी मुळेत जे काही बोलतात त्यामध्ये अपशब्द, शिव्या यांचा भरणा वाढलेला आहे . भले त्या शिव्यांचा अर्थ न कां कळेना , पण ठसक्यात शिवी द्यायची प्रवृत्ती मुलांमध्ये रूढ होऊ होत आहे. या समाज विघातक सवयीला आळा घालण्यासाठी संस्थेने 'सुभाषा अभियान' सुरू केले आहे. या अभियानात नेहमी चांगले बोलण्याचे महत्त्व मुलांच्या मनावर बिंबवले जाते आणि त्यांच्या तोंडातले अपशब्द, शिव्या कमी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. या उपक्रमाचा परिणाम इतका चांगला आहे, की शाळा पुन्हांपुन्हां हा कार्यक्रम ठेवत असतात. या उपक्रमात बालमानसशास्त्राच्या अभ्यासिका प्रा. मृदुला कर्णिक यांचा विशेष सहभाग आहे.

## चला मैदानाकडे

'सशक्त युवा' प्रकल्पांतर्गत हा उपक्रम चालवला जातो. या उपक्रमात , मुलांनी मोबाईल, टीव्ही यांचा अतिरिक्त वापर टाळावा आणि मैदानावर खेळावे, व्यायाम करावा , डोंगर-किल्ले चढावेत, निसर्गात बागडावं ; यासाठी एका अनोख्या पद्धतीने मुलांचे प्रबोधन केले जाते. प्रख्यात गिर्यारोहक श्री. विश्राम कुलकर्णी यांनी सह्याद्रीच्या काळ्याकभिन्न डोंगर-दऱ्यांपासून ते अगदी हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांपर्यंत उदंड गिर्यारोहण केलेले आहे. त्या भ्रमणादरम्यान त्यांनी स्वतः काढलेल्या सुंदर फोटोंच्या स्लाइड्स् दाखवून त्या सफरीमधून प्रत्यक्ष गेल्याचा अनुभव मुलांना सांगण्यात येतो . या कार्यक्रमामुळे ही मुले मोबाईल व टीव्हीच्या आभासी जगातून बाहेर पडून उंच गिरिशिखरांवर जाण्यासाठी उद्युक्त होतात.खरंतर हा कार्यक्रम मोठ्यांसाठीसुद्धा उपयुक्त आहे, असा अभिप्राय अनेकांनी दिलेला आहे,हे विशेष.

## सैनिक -नागरिक मैत्री अभियान

सैनिक आणि नागरिक यांच्यातली जवळीक वाढावी, सैनिकांचा त्याग आणि बलिदानाची जाणीव लहान वयातच मुलांना व्हावी, आणि सैनिकांमधली शिस्त बालक आणि पालक या दोघांनीही आत्मसात् करावी; यासाठी हे अभियान चालवले जाते. ' आपला सैनिक , आपला व्हॅलेंटाईन ' ही कल्पना घेऊन हा उपक्रम चालवला जातो जेणेकरून नागरिकांच्या मनावर हे ठसावं, की सैनिक हेच आपले खरे व्हॅलेंटाईन आहेत , जे आपल्यासाठी अक्षरशः जीव ओवाळून टाकायला तयार असतात. तसेच व्हॅलेंटाईन डेच्या नावाखाली चालणारे विपरीत प्रकार कमी व्हावेत, हाही एक उद्देश आहे.




## सुगम संस्कृत अभियान

संस्कृत या भाषेमध्ये प्रचंड ज्ञानभांडार दडलेले आहे. ते सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी आणि मुळातच संस्कृत भाषेची गोडी सर्वांना लागावी यासाठी सुभाषिते व अन्य माध्यमांतून संस्कृतचा प्रचार आणि प्रसार केला जातो.

## हिम्मत का तराना

जुनी अर्थपूर्ण गाणी, शेरोशायरी आणि कविता यांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचा 'हिम्मत का तराना' हा गुरुकृपा संस्थेचा एक ठोस प्रयत्न आहे . मानवी मनात दाटलेले नैराश्य व उदासीनतेचे मळभ दूर करण्यासाठी हा कार्यक्रम विविध ठिकाणी, विशेषतः वृद्धाश्रमांमध्ये सादर केला जातो. त्याचे अतिशय उत्तम परिणाम दिसत आहेत.

## सप्तपदी

सध्या आपण पाहतो, की नवरा-बायकोतले वाद, भांडण, दुरावा आणि घटस्फोट ही नित्याचीच बाब झाली आहे. त्यामुळे कुटुंब व्यवस्थेवर आणि विशेषतः लहान मुलांवर होत असणारे भयंकर परिणाम यांना आळा घालण्यासाठी गुरुकृपा संस्था ' लग्नानंतरची सप्तपदी' हा सेमिनार सार्वजनिकरित्या आयोजित करते. यामध्ये वेगवेगळ्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा विचार करून पती-पत्नीने एकमेकांमधला जिव्हाळा कसा वाढवावा आणि टिकवून ठेवावा यासाठी भारतीय संस्कृतीला अनुसरून आणि मानसशास्त्रीय, वैद्यकीय, व्यावहारिक , समाजशास्त्रीय तसेच धार्मिक दृष्टीकोनातून सांगोपांग विवेचन केले जाते. या सेमिनारचा श्रोत्यांच्या मनात खोलवर परिणाम होतो.

## तंबाखू विरोधी अभियान

हे अभियान सशक्त युवा प्रकल्पांतर्गत चालवले जाते. यामध्ये तंबाखू , सिगरेटपासून युवकांनी दूर राहावे म्हणून शॉर्ट-फिल्म, नाटक, बॅनर्स, स्टीकर्स, पोस्टर्स, पत्रके अशा विविध माध्यमांचा वेगवेगळ्या वयोगटांनुसार परिणामकारक वापर केला जातो . लहान वयातच मुलांच्या मनात तंबाखूविषयी तिटकारा निर्माण व्हावा, यासाठी विशेष प्रयत्न केला जातो. शॉर्ट-फिल्मच्या सिडीचे शाळा-कॉलेजांमध्ये मोफत वितरण केले जाते.

## शाकाहार

अन्नामधूनच शरीराची बरीचशी वाढ होत असल्याने, गुरुकृपा संस्था शाकाहाराचा पुरस्कार करते. मात्र यामध्ये कुणावरही सक्ती न करता शाकाहाराचे फायदे आणि मांसाहाराचे तोटे हे समजावून दिले जातात. त्याशिवाय 'चवीने नॉन-व्हेज पण शुद्ध शाकाहारी ' हे श्रीमती आशालता वाघमोडे यांचे पाककृतींचे पुस्तक गुरुकृपा संस्थेने प्रकाशित केले आहे. हे पुस्तक मांसाहाराचा त्याग करून शाकाहारी बनू पाहणाऱ्यांना नक्कीच एक मदतीचा हात ठरत आहे.

## वनौषधी संशोधन

आयुर्वेद आणि वनौषधी यांच्यावर गुरुकृपा संस्था दीर्घकाळापासून व्यापक संशोधन करीत आहे. मानवी जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी या गोष्टी अत्यंत उपयुक्त आहेत. 'गुरुकृपा वनौषधी संशोधन' या उपक्रमात रूग्णाच्या प्रकृतीची गहन चिकित्सा करून व्यक्तिनुरूप वनौषधी , आहार-विहार व अन्य माध्यमांतून उपचार केले जातात. त्यातून रूग्ण सहजगत्या व्याधिमुक्त होतो. या पद्धतीने बहुतेक सर्व आजार नष्ट होऊ शकतात, आणि निरोगी, निरामय, निकोप जीवन जगता येते.

## समृद्ध पर्यावरण

या प्रकल्पांतर्गत विविध ठिकाणी वृक्षारोपण करून ती रोपे व्यवस्थित वाढावीत, याची काळजी घेतली जाते. तसेच ओला कचरा घरीच जिरवून कंपोस्ट खत तयार करणे, सण साजरे करताना त्यातला धार्मिक आशय न गमावता पर्यावरणाचे संतुलन सांभाळणे, प्रदूषणाला आळा घालण्यासाठी फटाक्यांना विरोध इत्यादी अनेक उपक्रमांमधून पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

## प्रकाशन

गुरुकृपा संस्थेतर्फे अनेक लोकोपयोगी विषयांवर तसेच वैदिक ज्ञानावर मूलगामी संशोधन केले जाते. त्यातील निवडक भाग हा जनजागृती व ज्ञानप्रसार या हेतूने छोट्या छोट्या सामाजिक व धार्मिक पुस्तकांमधून प्रकाशित केला जातो . आजवर अशी पुष्कळशी पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि कित्येक वाचकांपर्यंत पोहोचली आहेत. त्याचा जनसामान्यांना आपल्या दैनंदिन जीवनाला सुकर करण्यामध्ये व ते सावरण्यामध्ये अतिशय मोलाचा उपयोग होत असतो.

## रक्तदान

गुरुकृपा संस्थेमार्फत रक्तदानासाठी शिबिरे आयोजित केली जातात. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना रक्त मिळावे, यासाठी प्रयत्न केला जातो. तसेच रक्तदान करण्यास इच्छुक असणाऱ्यांच्या संपर्क याद्या तयार केल्या जातात. रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर व्हावेत, आणि नवीन रक्तदाते तयार व्हावेत, यासाठी रक्तदान या विषयावरील पुस्तकाचे गेली अनेक वर्षे संस्था प्रकाशन करून विनाशुल्क वितरण करीत आहे.

## नेत्रदान

नेत्रदान करण्यासाठी प्रचार केला जातो. त्यासाठी इच्छुक असणाऱ्यांचे तत्संबंधीचे इच्छापत्र तयार करून घेतले जाते. नेत्रदानाविषयीचे गैरसमज दूर व्हावेत यासाठी प्रयत्न केले जातात. परिचितांपैकी कोणाचा मृत्यू झाल्यास कुटुंबीयांचे समुपदेशन केले जाते आणि मृत व्यक्तीचे नेत्रदान करवून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

## समुपदेशन

हल्ली आपण पाहतो , की आपले आरोग्य, आपले आयुष्य, आपले अर्थकारण इत्यादींसंबंधी मानसिक ताणतणाव वाढलेले आहेत. घरच्या माणसांशी मोकळ्या मनाने बोलण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. अशा व्यक्तींचे संस्थेचा प्रशिक्षित कार्यकर्ता दूरध्वनीवर संभाषण करून समुपदेशन करतो आणि त्यांच्यामध्ये जीवनाविषयीची सकारात्मकता वाढवण्याचा प्रयत्न करतो.

## सज्जन संपर्क अभियान

असं दिसतं की जगामध्ये वाईट वागणुकीची माणसं कमी आहेत. पण सर्वसाधारण माणसांची स्वतःपुरते पाहण्याची, संकुचित प्रवृत्ती आसुरी वृत्तीला शक्तिमान तसेच चांगल्या माणसांना कमजोर बनवण्यास अप्रत्यक्षरित्या कारणीभूत ठरत असते. त्यामुळे सज्जनांचा परस्पर संपर्क वाढावा, त्यांचे सामर्थ्य वाढावे आणि आपापले अहंकार, मतभेद , अभिनिवेश बाजूला ठेवून त्यांनी जगाच्या भल्यासाठी एकत्रितपणे कार्य करावे, यासाठी गुरुकृपा संस्था सज्जन संपर्क अभियान चालवते. गुरुकृपा संस्थेचे पुणे कार्यवाह, श्री प्रशांत थोरात म्हणतात, "खरी गरज आहे, ती समाजातल्या सर्व घटकांनी हे काम आपलं स्वतःचं आहे, त्यामध्ये आपलंच हित आहे , आपल्याच पुढच्या पिढीचं कल्याण आहे, हे समजून घेण्याची. हे जर लक्षात घेतलं तर गुरूकृपा संस्था करीत असलेल्या कार्याला समाजातील प्रत्येकजण मनापासून भरीव सहकार्य दिल्याशिवाय राहणार नाही. मग तो स्वतःचा वेळ, अनुभव, ज्ञान, जागा, अथवा आर्थिक सहयोग अशा कुठल्याही माध्यमातून का असेना"! गुरुकृपा संस्थेची मूळची चौकट कायम राखून अनेक उपक्रम यांमध्ये समाविष्ट केले जाऊ शकतात. हे उपक्रम जर मोठ्या प्रमाणात चालवता आले, तर संपूर्ण मानव जातीसाठी वरदान ठरतील आणि सद्यस्थितीत लक्षणीय सुधारणा निश्चितपणे होऊ शकेल.

# अन् शांताबाईचा वनवास संपला



मोहन दिवटे, लातूर
संपर्क क्र. 9860440900



आधुनिक केसरी

**आगामी पंचवीस वर्षानंतर म्हणजे 2047 साली आपणास भारतीय स्वातंत्र्याचा शतकोत्सव साजरा करायचाय. त्यासाठी 'पॉवर@2047' हा कार्यक्रम हाती घेत असतानाच मागील आठ वर्षात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात प्राप्त करण्यात आलेल्या विकासाच्या उपलब्धीहीवरही प्रकाशझोत टाकणे ओघानेच आले. स्वातंत्र्यानंतरच्या 67 वर्षातही देशाने विदयुत क्षेत्रात चांगली कामगिरी केली. त्याहीपेक्षा 2014 नंतरच्या आठ वर्षाच्या कालाखंडात झालेली या क्षेत्रातली कामगिरी अधिक गतीशील आणि प्रकाशमान व तितकीच प्रशंसनीय ठरते. हे विशेष!**

शांताबाई....., जानवळच्या अल्पभूधारक कष्टाळू शेतकरी. जानवळ हे लातूर जिल्हयातलं डोंगराळ भागातलं गाव. तिथल्या शांताबाई सांगत होत्या. म्हणाल्या, “मी आणि माझा नवरा तात्या. मोलमजुरीवर गुजराण करणारं आमचं कुटूंब. सोबतीला शाळा शिकणारी एक थोरली पोरगी अन् एक पोरगं. पदरी सात-बारावर आडीचतीन एकराची कोरडवाहू मुरमाड जमीन. धड ती कसताही येत नव्हती अन् वाऱ्यावर सोडूनही देता येत नव्हती. उत्पन्नाच्या नावानं तर कायम बोंबाबोंब असायची! योगायोगानं सरकारी अनुदानातून आम्हाला विहीर मंजूर झाली. आम्ही दोघांनीच घरातल्या दोन शाळकरी लेकरांच्या मदतीनं ती विहीर खोदली. ती चांगली चाळीस-बेचाळीस फुट खोल गेली. अनुदानातील सारी रक्कम ब्लास्टिंग, क्रेन आणि बांधकामातच खर्ची पडली. मजूर लावायला पैसेच शिल्लक राहणार नव्हते. कर्ज तरी किती काढायचं होतं? काढायची पाळी आली असतीच तर कुणी देणारंही नव्हतं. तितकी आमची पतही नव्हती. त्यामुळं आम्ही लेकरांसह दोघा नवरा-बायकोनंच जीवाचं रान करुन ती खोदली. त्यासाठी पुरे दोन वर्ष लागली. अथक परिश्रमातून खोदलेल्या विहीरीला नशीबानं चांगलं पाणीही लागलं... पण, रानात लाईटीची सोय नव्हती. जवळ कुठं खांब होता ना डिपी..! लांबहून दोनतीन बंडल वायर टाकून बघितलं. परंतु, कशाचं काय? व्होलटेजच मिळत नव्हतं! सारं महागा-मोलाचं वायर जळून गेलं. पण, मोटर काही चललीच नाही! भाडयाचं इंजन लावलं. तर, डिझेलचा खर्चच अधिक झाला..! चार आणे की मुर्गी अन् बारा आणे का मसाला..! अस्सा नामुस्कीचा प्रसंग गुदरला! त्यामुळं माझं कुटूंब मोठया संकटात सापडलं होतं....

खरं तर, दैवंयोगच चांगला म्हणायचा! दोन वर्षापूर्वी एक दिवस उजाडला अन् महावितरणच्या इंजिनिअर सायबानं अनुदानाच्या योजनेतून तातडीनं माझ्या विहीरीवर सौर कृषीपंप बसवून दिला. त्यामुळं आमचा कायमचा वनवासच संपला! तेंव्हापासून आता सारं झक्कास चालंलय.! आता कशाचीच फिकीर नाही. ना रातच्याला शेतात आंधारात जावून पिकाला पाणी देण्याची गरज नाही ना साप-विंचवाचीही भिती राहिली नाही. सौरपंपामुळं वापरलेल्या विजेच्या बिलाचा भरणा करण्याची सुध्दा गरज नाही. बसविण्यात आलेला हा सौरपंप आता पंचवीस वर्ष सेवा देणार आहे. आता फक्त दिवसाच आपल्या सोयीनुसार सौरपंप सुरु करता येतो. दिवसा सिंचनाची सोय झालीय. मुरमाड शेतातही पीक चांगलं पिकलंय. आमचं दारिद्रय आता संपत आलंय..!”

शांताबाईची ही एक यशोगाथा झाली. विजेच्या क्षेत्रात पुरविण्यात आलेल्या विविध सुविधांमुळे शांताबाईसारख्या अशा हजारो यशोगाथा सांगता येतील...




देश स्वतंत्र होऊन चौऱ्याहत्तर वर्ष पूर्ण झाली. आता स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करीत आहोत. त्यानिमित्ताने पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशभरात ‘उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य..’ चे स्वप्न ऊराशी बाळगून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने सर्व विभागाच्या वतीने लक्ष्याधारित कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. ऊर्जा विभागाच्या वतीनेही देशात आणि महाराष्ट्रात ‘पॉवर@2047’ हया उज्ज्वल भविष्याचा संकल्प हाती घेण्यात आला आहे. आगामी पंचवीस वर्षानंतर म्हणजे 2047 साली आपणास भारतीय स्वातंत्र्याचा शतकोत्सव साजरा करायचाय. त्यासाठी ‘पॉवर@2047’ हा कार्यक्रम हाती घेत असतानाच मागील आठ वर्षात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात प्राप्त करण्यात आलेल्या विकासाच्या उपलब्धीहीवरही प्रकाशझोत टाकणे ओघानेच आले. स्वातंत्र्यानंतरच्या 67 वर्षातही देशाने विदयुत क्षेत्रात चांगली कामगिरी केली. त्याहीपेक्षा 2014 नंतरच्या आठ वर्षाच्या कालाखंडात झालेली या क्षेत्रातली कामगिरी अधिक गतीशील आणि प्रकाशमान व तितकीच प्रशंसनीय ठरते. हे विशेष!

देशाचा विकास आणि विकासप्रक्रियेला गती देण्यासाठी विजेची भूमिका महत्वाची आहे. विकासासाठी विजेचा निरतंर आणि अखंडित पुरवठा आवश्यक असतो. त्यासाठी ती पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावी लागते. पुरेशा पायाभूत सुविधाही हव्यात. मात्र, या ना त्या कारणाने देशात 2014 पर्यंत विजेच्या मागणी आणि पुरवठयात तफावत होती. स्वातंत्र्याच्या 67 वर्षानंतरही 18374 खेडया-पाडयात वीज पोहचली नव्हती. सुमारे साडेतीन लाख कुटूंबं विजेपासून वंचित होती. 2018 मध्ये केंद्र आणि राज्यांनी व त्यांच्या विदयुत वितरण कंपन्यांच्या संयुक्त प्रयत्नातून दीन दयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना आणि प्रधानमंत्री सहज बिजली हरघर योजना या नावाने सौभाग्य योजना राबविण्यात आली. त्यातून वंचित खेडया-पाडयात विजेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. पुरवठा नसलेल्या सुमारे साडेतीन लाख घरांना वीज जोडण्या देण्यात आल्या. त्या योजनेवर सरकारतर्फे 16,320 कोटी रुपये खर्च करण्यात आले. 2014 मध्ये देशाची विजेची स्थापित क्षमता 2,48,554 मेगावॅट होती. ती आता आठ वर्षात 2,48,554 मेगावॅटवरुन 4,00,000 मेगावॅट इतकी वाढली आहे. आजची देशाची विजेची गरज 2.15 लाख मेगावॅट इतकी आहे. साधारणतः मागणीपेक्षा अधिकची शिल्लक असणारी वीज आपण शेजारी राष्ट्रांना निर्यात करतो. ही बाब भारतीयांना अभिमानास्पद ठरावी!

ही दैदिप्यमान परिस्थिती काही अगदी सहज निर्माण झालेली नाही. त्यापाठीमागे पंतप्रधान मोदी यांची प्रबळ ईच्छाशक्ती राहिलेली आहे. मागील पाच वर्षात 2,01,722 कोटी रुपयांचा खर्च करुन देशभरात 2921 नवीन विदयुत उपकेंद्रांची स्थापना, 3926 जून्या उपकेंद्रांच्या श्रेणीत वाढ आणि सोबतच 6,04,465 सर्किट किलोमीटरच्या लघुदाब वाहिन्या व 2,68,838 सर्किट किलोमीटर लांबीच्या 11 केव्हीएच्या उच्चदाब वाहिन्यांचे काम करण्यात आले. शिवाय, 1,22,132 सर्किट किलोमीटर इतक्या लांबीच्या कृषी वीज वाहिन्यांचे विलगीकरणही करण्यात आले. 7,31,961 नवीन वीज वितरण रोहित्रंही बसविण्यात आली. या कामी महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीकडूनही पुरक आणि लक्ष्यवेधी कामगिरी करण्यात आली. अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या पुढाकारात महावितरणतर्फे दीन दयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना, सौभाग्य योजना, आयपीडीएस, कुसूम योजना, एचव्हीडीएस, राज्य सरकारची मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि सौरकृषीपंप योजना यशस्वी आणि प्रभावीरित्या राबविण्यात आल्या. महाराष्ट्रासह इतर राज्यातही ते काम चांगले झाले. परिणामी, वर्ष 2015 मध्ये देशातील ग्रामीण क्षेत्रात विजेची 12:30 तासांची असलेली सरासरी उपलब्धता वाढून ती आता 22:30 तासांवर पोहचली आहे. देशपातळीवर असलेली शहरी भागातली विजेची सरासरी उपलब्धता 23:30 तासावरुन आता 24 तासावर आणण्यात आपण यशस्वी झालो आहोत. पॉवर@2047 मध्ये शहरीसह ग्रामीण भागातही वीज उपलब्धतेचे प्रमाण 24 तासांवर आणण्याचा संकल्प आहे. यासाठी औष्णिक विजेशिवाय अपारपंरिक ऊर्जा उत्पादन आणि वापरावर भर देण्यात येत आहे. नवीन व नवीकरणीय ऊर्जा ही पर्यावरणपूरक आहे. पर्यावरणाच्या काळजीपोटी भारताने ‘कोप-2021’ मध्ये केलेल्या निर्धारानुसार कार्बन उत्सर्जनाशिवाय 40 टक्के वीज उत्पादनाचे लक्ष्य 2021 मध्येच पूर्ण केले. नवीन व नवीकरणीय ऊर्जानिर्मितीत भारत आघाडीवर असून त्यात सौर ऊर्जा निर्मिती 57.5 गिगावॅट, पवन ऊर्जा 40.7 गिगावॅट, लघु जल विदयुत 5 पैकी 4.8 गिगावॅट वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करण्यात आले आहे. बायोमास ऊर्जेतही लक्ष्यापेक्षा अधिकची म्हणजेच 10.5 गिगावॅट वीजनिर्मिती करण्यात आली.

पॉवर@2047 च्या यशपूर्तीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंचसुत्री आखून दिली. त्यानुसार वर्ष 2030 पर्यंत जीवाश्म विरहित ऊर्जा निर्मितीक्षमता 500 गिगावॅटपर्यंत पोहचविणे, देशाची पन्नास टक्के विजेची गरज ही नवीन व नवीकरणीय ऊर्जेतून भागविणे, वीज निर्मितीतून होणारे कार्बन उत्सर्जन एक बिलियन टनाने कमी करणे, कार्बन उत्सर्जनाची तिव्रता 45 टक्क्यापर्यंत कमी करणे व नेट झिरो क्लायमेटची लक्ष्यपूर्ती करणे. अर्थात, यासाठी अक्षय ऊर्जेला प्राधान्य देणे महत्वाचे आहे. त्यासाठी देशभरातून पूरक प्रयत्न सुरु आहेत. ग्राहक समाधानासाठी विदयुत ग्राहक-नियम-2020 निर्धारित करण्यात आले आहेत. केंद्राच्या उज्ज्वल भविष्य संकल्पपूर्तीसाठी महाराष्ट्र सरकार, राज्याचे ऊर्जा मंत्रालय, प्रधान ऊर्जासचिव व महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवसथापकीय संचालक विजय सिंघल, महानिर्मितीचे संजय खंदारे आदी प्रयत्नशील आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या या एकत्रित प्रयत्नातून पॉवर@2047 समृध्द आणि अधिक पॉवरफुल ठरु शकते.

# रणवीर सिंगचा थिल्लरपणा




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**प्रसिद्धी मिळवण्यासाठी त्यांना अशा थिल्लरपणाची कधीही गरज भासली नाही कारण त्यांचा त्यांच्या कलेवर विश्वास होता. रणवीर सिंग सारख्या नव्या दमाच्या कलाकारांनी अमिताभ, रजनीकांत यांच्या सारख्या कलाकारांचा आदर्श घेतला पाहिजे. रसिकांच्या मनात स्थान मिळवायचे असेल तर या कलाकारांनी असला थिल्लरपणा सोडून अभिनयावर लक्ष केंद्रित करायला हवे.**

बॉलीवूडचा आघाडीचा अभिनेता रणवीर सिंग एका फोटोशूटने चांगलाच वादात सापडला आहे. अभिनेता रणवीर सिंग याने एका नियतकालिकेच्या मुखपृष्ठासाठी विवस्त्र पोज देऊन फोटोशूट केले. त्याचे हे विवस्त्र फोटो समाज माध्यमात व्हायरल होताच त्याच्यावर चुहुबाजुनी टीका होऊ लागली आहे. सामाजिक भावना दुखावल्या म्हणून काही ठिकाणी त्याच्यावर गुन्हाही दाखल झाला आहे तर दुसरीकडे राम गोपाळ वर्मा सारखे काही बॉलीवूडमधील मंडळी त्याचा समर्थनार्थ मैदानात उतरले आहेत. अर्थात अशा प्रकारे विवस्त्र फोटोसेशन करून खळबळ माजवणारा रणवीर सिंग हा बॉलिवूडचा पहिला कलाकार नाही. याआधी अनेक कलाकारांनी असे फोटोशूट करून खळबळ माजवली होती. १९७४ मध्ये प्रोतीमा बेदी या मॉडेलने बीचवर विवस्त्र धावतानाचे फोटो काढले होते. त्यावेळी तिच्यावर खूप टीका झाली होती पुढे पूजा बेदी या तिच्या मुलीनेही तिचाच कित्ता गिरवला होता. १९९५ साली मिलिंद सोमण आणि मधु सप्रे यांनी गळ्यात बिनविषारी साप घालून नग्न अवस्थेत फोटोसेशन केले होते. मिलिंद सोमण याने दोन वर्षापूर्वीही समुद्र किनारी विवस्त्र धावत फोटोसेशन केले होते. ममता कुलकर्णी या बॉलिवूडच्या अभिनेत्रीनेही एका मासिकाच्या मुखपृष्ठासाठी असेच फोटोसेशन केले होते. आता रणवीर सिंगने देखील त्यांचा कित्ता गिरवत भीभत्स फोटोसेशन केले आहे. वास्तविक रणवीर सिंग हा चांगला अभिनेता आहे. अनेक चित्रपटात त्याने दमदार भूमिका केल्या आहेत. त्याचे फॅन फॉलोअर्सवर देखील खूप आहेत मग त्याला ही अशी अवदसा का आठवली असेल? असा प्रश्न त्याच्या चाहत्यांना पडला आहे. पैसा आणि प्रसिद्धीसाठी बॉलिवूडवाले असे धंदे करत असतील असे मानले तरी हे सभ्यतेला धरून नाही. हे फोटोसेशन जितके धक्कादायक आहे त्याहून त्याचे समर्थन अधिक धक्कादायक आणि संतापजनक आहे. निर्माता दिग्दर्शक राम गोपाळ वर्मा याने जर स्त्रिया आपले मादक शरीर दाखवू शकतात तर पुरुष ते का करू शकत नाही ? असा प्रश्न विचारून रणवीर सिंगचे समर्थन केले आहे. वास्तविक महिलांचे मादक शरीर पडद्यावर कोणी दाखवले ? राम गोपाळ वर्मा सारख्या निर्माते दिग्दर्शकांनीच ना ? जर यांनी महिलांची चांगली प्रतिमा दाखवली असती तर समाजात चांगला संदेश गेला असता पण प्रश्न संस्कार आणि सभ्यतेचा आहे. हेच संस्कार आणि सभ्यता बॉलिवूडमधून हद्दपार होऊ लागली आहे. म्हणूनच अशा गोष्टी घडत आहेत. वास्तविक रणवीर सिंग असो की बॉलिवूडचा कोणताही कलाकार त्यांना मानणारा खूप मोठा वर्ग आपल्या देशात आहे. तरुण पिढीचे तर ते आयडॉल आहेत. अनेक तरुण मुले त्यांचे अनुकरण करतात. असे फोटोसेशन करून त्यांच्यापुढे आपण काय आदर्श ठेवत आहोत याचा विचार या कलाकारांनी करावा. कलाकार हा त्यांच्या कलेसाठी ओळखला गेला पाहिजे अशा थिल्लरपणासाठी नव्हे. असा थिल्लरपणा करून प्रसिद्धी मिळणारे कलाकार काळाच्या ओघात नाहीसे होतात. वर उल्लेख केलेल्या कलाकारांचे पुढे काय झाले हे आपण पाहिलेच आहे. अमिताभ बच्चन, रजनीकांत या सारखे कलाकार आज महान कलाकार म्हणून ओळखले जातात. हे महानपद त्यांना त्यांनी जो अभिनय केला त्यामुळे मिळाले आहे. प्रसिद्धी मिळवण्यासाठी त्यांना अशा थिल्लरपणाची कधीही गरज भासली नाही कारण त्यांचा त्यांच्या कलेवर विश्वास होता. रणवीर सिंग सारख्या नव्या दमाच्या कलाकारांनी अमिताभ, रजनीकांत यांच्या सारख्या कलाकारांचा आदर्श घेतला पाहिजे. रसिकांच्या मनात स्थान मिळवायचे असेल तर या कलाकारांनी असला थिल्लरपणा सोडून अभिनयावर लक्ष केंद्रित करायला हवे.



शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल अ‍ॅक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/- पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/- पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

आधुनिक केसरी

# विहिरीचे लग्न

एकदा बादशहा आणि बिरबल मध्ये खूप कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरात बादशहा बिरबलाला म्हणाला तू राजधानी सोडून चालता हो. तुझी मला मुळीच गरज नाही.
बिरबल अतिशय स्वाभिमानी होता. तो ताबडतोब राजधानी सोडून निघून गेला आणि एका गावात वेश बदलून राहू लागला.
बरेच दिवस उलटून गेले तरी बिरबल राजधानी मध्ये परतला नाही. बादशाहला मात्र सारखी त्याची उणीव भासे, त्याची कामे अडून राहू लागली आणि त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे बादशाहला त्याच्या शिवाय करमत नव्हते. अन्न गोड लागत नव्हते. बादशाहाने अनेक प्रकारे बिरबलाचा शोध घेतला. परंतु बिरबल सापडत नव्हता.
बिरबलाला कसे शोधून काढावे यावर बादशाहने खूप विचार केला. बादशाहने बिरबलाच्या सहवासात बरेच दिवस घालवले होते. त्यामुळे बादशाहालाही त्याला शोधून काढण्याची युक्ती सुचली. त्याने प्रत्येक गावात दवंडी पिटली. राजवाड्यातील विहिरीचे लग्न करावयाचे आहे.
लग्न समारंभ थाटात होणार आहे. तरी प्रत्येक गावाच्या लोकांनी आपआपल्या विहिरीसह उपस्थित रहावे. जे उपस्थित राहणार नाही त्यांना जबरदस्त दंड केला जाईल. सर्व लोक चिंतेत पडले कुणालाच काही सुचेना.
बिरबल ज्या गावात राहत होता त्या गावातले लोकहि चिंतेत पडले होते. गावच्या पुढारींना या समस्येला कसे तोंड द्यावे समजत नव्हते. ठिकठिकाणी चर्चा सुरु झाल्या लोकांची मते घेतली जाऊ लागली. अशाच एका सभेला शेतकऱ्याचा वेश घेतलेला बिरबल हजर होता. त्याने गावकरींना जाण्याची युक्ती सांगितली. गावकरी खुश झाले. एक दिवस गावातील पाच-सहा प्रमुख पुढारी उंची वस्त्रे घालून दिल्लीला गेले. दरबारात बादशहा पुढे हात जोडून ते म्हणाले, "खाविंद आपल्या आज्ञेप्रमाणे आणि निमंत्रण स्वीकारून आपल्या राजवाड्यातील विहिरीच्या लग्नाला आमच्या गावाच्या झाडून सर्व विहिरींना घेवून आम्ही हजर झालो आहोत."
आमच्या गावच्या विहिरी वेशी बाहेर थांबल्या आहेत. तेव्हा आपल्या रीतिरिवाजाप्रमाणे राजधानीतील काही प्रमुख विहिरींना त्यांचे स्वागत करण्यासाठी वेशी पर्यंत पाठवावे. त्याचे बोलणे ऐकून बादशहा जोरात हसला आणि ओरडला, बिरबल सापडला!
बादशहा म्हणाला, अजून पर्यंत एकही गावाचे लोक राजधानीत आले नाही. तुम्हीच प्रथम हजर झाला. तुम्हाला हि युक्ती कोणी सांगितली?
"एका शेतकऱ्याने महाराज!", गावकऱ्यांनी नम्र पने उत्तर दिले.
तो शेतकरीच माझा बिरबल आहे.
बादशाच्या डोळ्यात आनंद अश्रू आले. ताबडतोब त्याने माणसांबरोबर लवाजम्यासहित काझीला पाठवले. बिरबलला राजधानीत सन्मानाने आणण्याचा हुकुम दिला.
बिरबल बादशाच्या महालात आला आणि त्याने बिरबलाला मिठी मारली.



## शब्दांचे खेळ...!

काळ्या-काळ्या फळ्यावर
सुंदर शब्दांचे घर,
काही शब्द हे व्यंजन
तर काही शब्द हे स्वर.

काना-मात्रा, अनुस्वार
वेलांटीचा जमे मेळ,
खेळतात एकोप्याने
सगळे शब्दांचे खेळ.

काही शब्द भांडतात
भांडतांना दिसे छान,
प्रत्येक शब्दांचा अर्थ
पाहून हरपते भान.

विरामचिन्हे खेळती
ती शब्दांच्या बरोबर,
रेघांच्या टोप्या सरळ
छान दिसे शब्दांवर.

शब्द बोलून-बोलून
फुटे शब्दांना अंकुर,
शब्दांचे मधूर गाणे
घुमती आभाळभर...!

## पुस्तकांशी दोस्ती...!

जे सूर्याला न दिसते
ते पुस्तकात असते,
पुस्तकांचे नि आपले
नाते दोस्तीचे असते.

पुस्तकांच्या ओळी परी
होऊन उडत जाते,
नदी झुळझुळ वाहते
कोकिळा गाणी गाते.



पुस्तकांमध्ये असते
आई-वडिलांची माया,
कोटी-कोटी देवतांची
साऱ्यांवर असते छाया.

महापुराच्या कथा आणि
बालकांचे धाडस पाही,
विज्ञानाची जादू आणि
कविता चालीवर गाई.

सिंदबादच्या सफरी
मनाला आनंद देते,
जगभरातले ज्ञान हे
पुस्तकांमध्ये असते...!

अय्युब पठाण लोहगांवकर, ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## आई चे काम...



हत्तीच्या बाळाला
झोका देतं कोण ?

जिराफाच्या बाळाला
कपडे शिवतं कोण ?

चिऊ च्या बाळाला
शिकवतं कोण ?

वाघाच्या बाळाला
अंघोळ घालतं कोण ?

सिंहाच्या बाळाला
खेळवतं कोण ?

बाळाच्या कामात
आई शिवाय कोण ?

बलराज संघई,
मो. 9420015108

## आदर्श विद्यार्थी

अभ्यासू व जिज्ञासू
असावा विद्यार्थी
मनी नको अहंकार
नको नियत स्वार्थी

खेळकर असावी वृत्ती
पण नको धिंगामस्ती
अंगी असावी सदा
कर्तव्याशी दोस्ती

नको कामचुकारपणा
नको अंगी आळस
आत्मविश्वासाने
चढावा यशाचा कळस

जेष्ठांना वंदन करुन
सदा आशीर्वाद घ्यावा
सुप्त कला गुणांना
नेहमी वाव द्यावा

चांगल्या मित्रांशी
संगत नेहमी जडावी
आदर्श विद्यार्थी म्हणून
जगी कीर्ती घडावी

## चांदोबाच्या नगरीत

चांदोबाच्या नगरीत
फुलांची झाडे
सुगंधाने दरवळती
उंच उंच वाडे

चांदोबाच्या नगरीत
रात्रीची शाळा
विद्यार्थी म्हणून
चांदण्या होतात गोळा

चांदोबाच्या नगरीत
ढगांचा लपंडाव
जोराची हवा सुटलाच
होते त्यांची धावाधाव

चांदोबाच्या नगरीत
आकाश निळे निळे
ढगांच्या गर्जनेने
भित्रा ससा पळे


- रविंद्र व्ही. चालीकवार, महागाव,
जि.यवतमाळ, मो. 9011559106

# एक गरुड आणि एक घुबड

बोधकथा

आधुनिक केसरी

एक गरुड आणि एक घुबड, फार दिवस एकमेकांशी भांडत असत. शेवटी त्यांनी परस्परांशी मित्रत्वाने वागण्याची शपथ घेतली व एकमेकांच्या पिल्लांस खाऊ नये असे ठरविले.
घुबड गरुडास म्हणाले, 'गडया ! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला ठाऊक आहे ना? ठाऊक नसेल, तर ती दुसऱ्या एखादया पक्ष्याची आहेत असे समजून तू त्यांना गट्ट करशील, अशी मला भीति वाटते,' गरुड म्हणाला, 'खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, हे मला मुळीच ठाऊक नाही.' घुबड म्हणाले, 'ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल.' पुढे एके



दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. त्यांजकडे पाहून तो म्हणाला, 'किती घाणेरडी, कंडाळवाणी आणि कुरूप पिल्ले ही ! आपली पिल्ले फार सुंदर असतात, म्हणून घुबडाने सांगितले आहे. तेव्हा, ही घुबडाची पिल्ले खास नव्हते. यास मारून खाण्यास काही हरकत नाही.' असे म्हणून त्याने त्या पिलांचा फडशा उडविला!
आपली पिल्ले नाहीशी झालेली पाहून घुबड गरुडाला म्हणाले, 'गडया ! माझी पिल्ले तूच मारून खाल्लीस, असे मला वाटते.' गरुड म्हणाला, 'मी खाल्ली खरी, पण तो माझा दोष नव्हे. तू आपल्या पिल्लाचे जे खोटेचे वर्णन केलेस, त्यामुळे ती मला ओळखिता आली नाहीत. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील, दुसऱ्या एखादया पक्ष्याची असतील, असे समजून मी ती मारून खाल्ली, यात माझा काय अपराध आहे बरे?'
**तात्पर्य : स्वतःसंबंधाची खरी हकीकत लपवून ठेवून, भलतीच हकीकत सांगणारा मनुष्य शेवटी आपणास संकटात पाडून घेतो.**





# पुसदच्या जिनिंगची १०० कोटींची जमीन ३५ कोटीत केली विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** येथील शेषराव पाटील सहकारी जिनिंग प्रेसिंगच्या १० एकर जमिनीची ३ दिवसापुर्वी विक्री गुप्तपणे करण्यात आली. ही विक्री बेकायदेशीर असून ती जमीन मुळात मदिना मस्जिदला दान करण्यात आलेली आहे. या व्यवहारात प्रचंड घोटाळा झाला असून महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडे रीतसर तक्रार करण्यात आली आहे. वक्फ बोर्डने सदर जमिनीची झालेली खरेदी रद्द करावी, असे आदेश दिले आहेत. ती जमीन परत मिळविण्यासठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव डॉ. मो.नदीम यांनी सांगितले.

शेषराव पाटील जिनिंग ही जमीन मुळात बोरी येथील इजारदार नाजु बेगम शेर मो. खान यांच्या मालकीची होती. ती त्यांनी १९५५ मध्ये पुसद येथील मदिना मस्जिदला दान दिली असल्याचे उघडकीस आले आहे. वक्फ बोर्डाच्या कायद्यानुसार ही मालमत्ता कोणालाही विकता येत नाही. मात्र १९५९ ते १९६५ या कालावधीत १० एकर जमीन जिनिंग प्रेसिंगला व उर्वरित जमीन नाईक परिवारातील सदस्यांना विकली.

या संदर्भात डॉ मोहम्मद नदीम व मस्जीदचे अध्यक्ष सचिव पदाधिकारी यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले. वक्फ बोर्डाच्या नियमानुसार ही दान जमिन खरेदी विक्री झालीच कशी ? १०० कोटीची ही जमिन केवळ ३५ कोटीत कशी विकली ? असा सवाल उपस्थित केला.

याबाबत वक्फ बोर्डचे अध्यक्ष तथा काँग्रेस आमदार डॉ.वजाहत मिर्झा यांच्याकडे तक्रार करुन खरेदी रद्द करण्याची मागणी केली. त्यानुसार खरेदी रद्दचे आदेश वक्फ बोर्डाने तहसिलदार व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना देण्यात आले आहेत. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष आमदार डॉ.वजाहत मिर्झा यांनी समाजास न्याय देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल स्थानिक बांधवांनी त्यांचे आभार मानले.



औरंगाबाद : काही दिवसांपूर्वी झांबड इस्टेट येथील रहिवासी रोटे काका यांच्याकडे चोरी झाली होती. पोलिसांच्या तपासात चोर पकडल्या गेले आणि चोरांकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आज उस्मानपुरा पोलिस स्टेशन येथे चोरांकडून हस्तगत झालेला ऐवज रोटे काका यांना परत करण्यात आला. याप्रसंगी पोलीस निरीक्षक गीता बागवडे, उपनिरीक्षक अबुद, पंकज वाडकर यांची उपस्थिती होती.

# औराळा येथे माजी आ. नितीन पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा ग्रामपंचायत कार्यालय परिसरात माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून वृक्ष संगोपनाची जबाबदारी सर्व तरुण वर्गाणी पुढाकार घेण्याची गरज आहे. पावसाळ्यामध्ये वृक्षरोपण सर्वच करतात परंतु लावलेल्या वृक्षाचे संगोपन करणे महत्त्वाचे आहे. आपण लावलेल्या वृक्षाचे संगोपन होईल, या दृष्टिकोनाने वृक्षरोपण लावण्याचा प्रयत्न करावा आज औराळा ग्रामपंचायत च्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतने निर्णय घेऊन वृक्षारोपण करून पर्यावरणाच्या



संतुलनासाठी गरजेचे आहे, असे मत माजी आमदार नितीन पाटील यांनी वृक्षरोपण प्रसंगी औराळा ग्रामपंचायत कार्यालयासमोर व्यक्त केले.

यावेळी मध्यवर्ती बँकेचे संचालक मनोज राठोड, ग्रामसेवक सुजाता गवई, भाजपा शहर प्रमुख सुरेश डोळस, विकास सोसायटी गट सचिव अण्णासाहेब शिंदे, सोसायटीचे चेअरमन रमेश खंडेलवाल, सरपंच सोनाली सुरेश बागुल, उपसरपंच आकाश पगारे, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र भारतीय, दिशांत जिवरख, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष देविदास राठोड, चंद्रकांत बागुल, बद्रीनाथ निकम, सुभाष रिंढे, सतीश जिवरख, अहिरे, श्रीरंग जगताप, तातेराव जिवरख, दीपक जिवरख आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

**वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. वृक्ष हे आपल्याला ऑक्सिजन देतात व वृक्षामुळे आपल्याला फळ मिळतात. तरुण पिढीने आदर्श घेऊन प्रत्येक ठिकाणी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. आज एक आगळा वेगळा नवा आदर्श तालुक्यामध्ये आपल्या ग्रामपंचायत जगापुढे घडून दिला आहे. ग्रामपंचायतने ठरवले तर प्रत्येक गावात कुटुंबातील सदस्याप्रमाणे जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याची गरज आहे.**

**सुजाता गवई**
**ग्रामसेवक औराळा**

# श्री लक्ष्मी माता मंदिरात महाप्रसाद, महाआरती आणि भव्य रक्तदान शिबिर



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील एन- ६ संभाजी कॉलनी येथे प्राचीन असलेले लक्ष्मी माता मंदिरामध्ये प्रति वर्षीप्रमाणे आषाढ महिना समाप्ती व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मंदिरात महाआरती-महाप्रसाद, भव्य रक्तदान शिबिर व शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शिवसेना विधानसभा संघटक रेणुकादास वैद्य, उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी, शिवसेना महिला आघाडीच्या शहर संघटक सौ.विद्याताई अग्निहोत्री, उपशहरप्रमुख राजेंद्र दानवे, नगरसेवक वीरभद्र गादगे, गटनेते मकरंद कुलकर्णी, विभागप्रमुख रघुनाथ शिंदे, सोपान बांगर, महिला आघाडी उपशहर संघटक सीमाताई गवळी, नंदू लबडे, किशोर राजपूत, विजय सिंह राजपूत, शाखाप्रमुख बद्रीनाथ ठोंबरे, अरुण गव्हाड, कचरू काथार, बसराज दाजी, प्रशांत भालेराव, मंगेश वाघ, अमोल बुद्रुक, प्रशांत साळुंखे, शिवकुमार देशमुख, अर्जुन बारवाल, सागर राऊत, नितीन मोहिते, रवी जैस्वाल, गजानन बिडवे, आशिष लकडे तसेच परिसरातील महिला वर्ग, तरुण मित्र यांची उपस्थिती होती.

# कळंकी येथील कार्यकर्त्यांचा मनसेत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील कळंकी येथील कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशाने तसेच मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, सर-चिटणीस संतोष नागरगोजे, प्रवक्ते प्रकाश महाजन, राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे, सतनाम सिंग गुलाटी, जिल्हा अध्यक्ष वैभव मिटकर, जिल्हा सचिव गौतम शिरसाठ, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब थेट यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका अध्यक्ष विकास बागुल, तालुका सचिव गोपालसिंग राजपूत, शहर अध्यक्ष शशांक महादाने, शहर सचिव शैलेश



राऊत यांच्या उपस्थितीत कळंकी येथील कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश केला. मनसे जेऊर सर्कल प्रमुखपदी महेश नामदेव थोरात यांची निवड करण्यात आली.

# पंचवटी भागात मानवी वस्तीजवळ आढळला मोर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील देवपूर पंचवटी भागात आषाढी अमावस्येच्या सायंकाळी मोराचे पिलू आढळले. गटारी पार्टी साजरी करण्यासाठी या मोराच्या पिल्लाला आणले तर नव्हते ना? अशी शंका नागरिकांच्या मनात आहे. याचा तपास वन विभाग करत आहे.

पक्षी मित्रांनी या मोराच्या पिल्लाला ताब्यात घेत देवपूर पोलीस स्टेशन गाठले. देवपुर परिसरात आढळलेला राष्ट्रीय पक्षी मोर याला पोलिस निरीक्षक निकम, पोलिस कर्मचारी मिलिंद सोनवणे, मुकेश वाघ, शशिकांत देवरे यांच्या उपस्थितीत वनविभागाच्या स्वाधिन करण्यात आले. यावेळी वनविभाग



अधिकारी बोरसे व शिवसेनेचे शाखाप्रमुख शुभम मतकर, प्राणी मित्र हर्षवर्धन राजपुत, जयेश पाटील उपस्थित होते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# श्री संत शंकर स्वामी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाची तयारी पूर्ण

## अकरा हजार एकशे अकरा किलो साखरेपासून तयार होणार महाप्रसाद, ज्ञानदान व अन्नदानाचा होणार महाजागर

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**शिऊर :** जगदगुरु संत तुकाराम महाराजांचे शिष्य संत निळोबाराय आणि निळोबारायांचे शिष्य शिऊरचे श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान शिऊर फडाचा २७७ वा फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह यावर्षी स्वामींची संजीवन समाधी असलेल्या श्री क्षेत्र शिऊर येथे होत आहे. सराला बेटाचे सदगुरु गंगागिरी महाराज हे वद्य एकादशीला श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या दर्शनाला पायी येत असत, दर महिन्याच्या एकादशीला सद्‌गुरू गंगागिरी महाराज शिऊरला पायी वारी करत असल्याने स्वामींचा लौकिक मोठा आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर व्यापक प्रमाणात होणाऱ्या या सप्ताहाची तयारी पूर्ण झाली असून भाविकांत चैतन्याचे वातावरण आहे.

**भव्य मंडप, एलएडी स्क्रीनच्या माध्यमातून सप्ताहाचे थेट प्रक्षेपण**

तिर्थक्षेत्र शिऊर येथे दि.२ ते ९ ऑगस्ट दरम्यान हा सप्ताह होणार असून तब्बल २३००० स्वेअर फुटाच्या भव्य आकर्षक मंडपात राज्यातील नामवंत कीर्तन प्रवचनकारांचे कार्यक्रम होणार आहे. विश्वस्त मंडळाच्या पुढाकाराने कायमस्वरूपी भव्य कीर्तन मंडप उभारण्यात आला. या सोबतच वॉटरप्रूफ मंडप देण्यात आला आहे. आकर्षक रंगसंगतीत तयार केलेला देखणा मंडप व स्वागत कमान लक्ष वेधून घेत असून किर्तन मंडपातून एलएडी स्क्रीनच्या माध्यमातून सप्ताहाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहेत.

**अध्यक्षांकडून चुलबंद निमंत्रण**

हा अखंड हरिनाम सप्ताहात व्यापक प्रमाणात अन्नदान होणार आहे. दररोज परिसरातील गावातून भाकरी येणार असून दररोज जवळपास पाच हजार लिटर आमटी तयार करण्यात येणार आहे. संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव यांनी थेट चुलबंद निमंत्रण देऊन सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



**लाखो भाविक राहणार उपस्थित, ऐतिहासिक ठरणार स्वामींचा सप्ताह**

**आमटीचे ट्रॅंकर, ९ चुलांगण**

अखंड हरिनाम सप्ताहात अन्नदानाला विशेष महत्व आहे. अन्नदानाची सुरुवात श्री संत शंकरस्वामी महाराजांनी २७७ वर्षापूर्वीच सुरू केली होती. ही परंपरा कायम ठेवत अधिक व्यापक स्वरूपात वाढविण्यासाठी समाधी मंदिर विश्वस्त मंडळ व सप्ताह समिती प्रयत्नशील आहे. भाविकांना भोजनासाठी ट्रॅंकरच्या माध्यमातून आमटी वितरित करण्याचे नियोजित आहे तर दि. ९ रोजी काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद वितरित करण्यात येणार आहे. जवळपास एक लाखावरून अधिक भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात असून त्या दृष्टीने तयारी सुरू करण्यात आली आहे. तब्बल १११ पोते साखरेच्या माध्यमातून महाप्रसाद तयार करण्यात येणार असून यासाठी मोठे ९ चुलांगण तयार केले आहे.

**अध्यक्षांसह विश्वस्त व सप्ताह समितीचे सुक्ष्म नियोजन**

ऐतिहासिक ठरणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताहासाठी अध्यक्ष एकनाथराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त व सप्ताह समितीचे सूक्ष्म नियोजन केले गेले आहे. भाविकांची कुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे. सोबतच स्वच्छता, पाणी पुरवठा, वीजपुरवठा, इंधन व्यवस्था, भोजन व्यवस्थेचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. भाविकांना किर्तन प्रवचन श्रवणासाठी दर्जेदार ध्वनीक्षेपक व थेट प्रक्षेपण करणारे एलइडी स्क्रिनची व्यवस्था केली आहे.

**सप्ताहाची वैशिष्ट्य**

अखंड २४ तास चालणारे भजन... १५ मिनिटांत लाखो भाविकांना एकाचवेळी महाप्रसाद वितरण... या महाप्रसादासाठी गावागावांतून एकाचवेळी येणाऱ्या विनामूल्य लाखो भाकरी... एकाच वेळी तयार होणारी तब्बल पाच हजार लिटर आमटी.. अखंड चालणारे आमटी-भाकरी प्रसाद वितरण. सात दिवसाच्या या उत्सवात शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम असतो. अशा अनेकविध वैशिष्ट्यांचा हा सद्‌गुरू शंकर स्वामी महाराज सप्ताह असणार आहे.

**नियमित हरी जागर**

श्री संत शंकरस्वामी महाराज यांनी स्थापन केलेल्या श्री विठ्ठल रुख्मिनी मंदिरात सप्ताह काळात हरी जागर होणार असून सात दिवसीय पहारा आयोजित केला आहे. तालुक्यातील गावातील भजनी मंडळींच्या माध्यमातून अखंड नामजप होणार आहे.

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहण्याची शक्यता**

संप्रदायाचे केंद्रबिंदू असणाऱ्या श्री संत शंकरस्वामी महाराज अखंड हरिनाम सप्ताहामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सदिच्छा भेट देण्याची शक्यता आहे. संस्थानचे अध्यक्ष, भाजपा राज्य कार्यकारणीचे सदस्य एकनाथराव जाधव यांनी त्यांना सप्ताहाचे निमंत्रण दिले आहे.

**शिऊर पोलिसांनी केली सप्ताह स्थळाची पाहणी**

शिऊर पोलीस ठाण्याचे सपोनि संदीप पाटील, अविनाश भास्कर यांनी सप्ताह स्थळाची पाहणी करत नियोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

# फर्दापूरला नाल्याचे पाणी रस्त्यावर साचल्याने आले पाणंदाचे स्वरूप

आधुनिक केसरी न्यूज



**फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील फर्दापूर हे गाव खान्देश आणि मराठवाड्याच्या सीमेजवळ वसलेले आहे आणि जगप्रसिद्ध अजिंठा लेणी जवळ आहे. जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांमुळे देशी-विदेशी पर्यटक गावात येत राहतात. दुसरीकडे असुविधांमुळे पर्यटकांसह ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ऐतिहासिक अजिंठा लेण्यांजवळ आहे फर्दापूर गाव होऊनही गावाचा विकास झाला नाही.

मुख्य चौकात अनेक वर्षे उलटून गेल्यानंतरही हद्दीचा रस्ता आजतागायत तयार झालेला नाही. यामध्ये चौकातील नाल्यांचे पाणी रस्त्यावर वाहून जाते. पाऊस पडल्यानंतर या रस्त्यावर एवढा चिखल होतो की येथून चालणेही कठीण होते. शाळेत जाताना लहान मुलांनाही या चिखलातून जावे लागते. अनेकवेळा ही लहान मुले चिखलात घसरून पडतात. या मुख्य चौकाच्या मधोमध नाल्याही आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांना दुचाकी चालवताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अनेकवेळा दुचाकीस्वार कुटुंबासह घसरून दुचाकीवरून पडले. मात्र या मुख्य चौकात ग्रामपंचायतीने सिमेंट रस्ता बांधला नाही. अनेकवेळा परदेशी पर्यटकही या मुख्य चौकात येत असताना त्यांनाही याच अडचणीतून जावे लागते.

**रुग्णालयात सुविधा नाहीत ऐन पावसाळ्यात रुग्णांची होते पायपीट**

फर्दापूर बसस्थानकातील हॉटेलमध्ये हजारो पर्यटकांचा मुक्काम अस्तात. अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या सर्व परदेशी पर्यटकांना या बसस्थानकावरून जावे लागते. कधी कधी त्यांना हॉस्पिटलची गरज असते, इथे मोठे हॉस्पिटल नाही. ग्रामस्थांनाही आपत्कालीन परिस्थितीत आजारी पडल्यावर येथील महिलांच्या डिलेव्हरी करण्यासाठी जळगाव, सिल्लोड, औरंगाबाद येथे जावे लागते. येथे मोठे सरकारी रुग्णालय नाही. त्यामुळे ग्रामस्थांसह पर्यटकांनाही जळगाव, औरंगाबाद, सिल्लोड, हॉस्पिटलमध्ये जावे लागते. प्रशासनाने याकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

**एटीएम सुविधा नाही**

फर्दापर या गावात बँकेचे एटीएम नाही. अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना पैशांची गरज असताना एटीएमची गरज भासते. येथे एटीएम मशीन नसल्याने पर्यटकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथे एटीएम असणे अत्यंत गरजेचे आहे.

**मोठा प्रकल्प आवश्यक**

पावसाळ्यात शेकडो लिटर पाणी लेण्यांच्या डोंगरातून आणि वाघूर नदीतून वाहत असते. हे थांबविल्यास फर्दापूर गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे आणि शेतकऱ्यांनाही याचा फायदा होणार आहे. त्यामुळे येथे मोठा प्रकल्प व्हावा.

**गावाचा विकास होणे अत्यंत गरजेचे**

गावात अनेक ठिकाणी आजही रस्त्यावरील नाल्यांचे घाण पाणी वाटेत वाहत असते. गावात अनेक ठिकाणी सिमेंटच्या नाल्या नाहीत. रस्त्याला मर्यादा नाही. या गावातील अजिंठा लेणी पाहिल्यानंतर परदेशी पर्यटक गावात फिरतात, त्यामुळे या गावाचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. याकडे ग्रामपंचायत व शासनाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. या गावाच्या विकासासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा. फर्दापूर हे गाव सोयगाव तालुक्यात येते. सोयगाव सिल्लोड विधानसभेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी या गावाकडे अधिक लक्ष दिल्यास या गावाचा नकाशा बदलू शकतो.

# सीमा मंगरूळे यांना दोन पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** भीम क्रांती सोशल फाउंडेशन हरोली यांचे वतीने 2022 चा 9 ऑगस्ट



क्रांती दिन निमित्ताने यावर्षीचा भारतीय साहित्यरत्न महिला गौरव पुरस्कार सीमा सोमनाथ मंगरूळे तवटे तालुका खटाव यांना बहाल करण्यात येणार आहे. हा पुरस्कार दि. 9 ऑगस्ट रोजी कुमार विद्या मंदीर हरोली ता. शिरोळ येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

तसेच प्रतिष्ठान न्युज सांगलीचा झिंदाबाद साहित्यिक पुरस्कार दि.7 ऑगस्ट रोजी मराठा साहित्य संघ, सांस्कृतिक भवन सांगली येथे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानामुळे त्यांना हे पुरस्कार देण्यात येत आहेत, असे मंडळातर्फे सांगितले आहे. या दोन्ही पुरस्काराबद्दल त्यांच्या हितचिंतकाकडून प्रशंसा होत आहे. सीमा मंगरूळे या तवटे, वडूज जि. सातारा येथील शाळेत प्राथमिक शिक्षिका आहेत.

भारतीय साहित्य रत्न महिला गौरव पुरस्कार भीम क्रांती सोशल फाउंडेशन हरोली आपणाला पुढच्या कार्यासाठी फाउंडेशनच्या वतीने व निवड समितीच्या वतीने हार्दिक हार्दिक शुभेच्छा देत आहे, असे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे हारोली तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर यांनी सांगितले.




# "थोडेसे मायबापासाठी पण" उपक्रमाअंतर्गत आरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** मुलानी वाडगाव आरोग्य वर्धिणी उपकेंद्र अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र ढाकेफळ येथील वैदयकीय अधिकारी डॉ. अतुल बोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अझादिका अमृत महोत्सव निमित्त "थोडेसे मायबापासाठी पण" या उपक्रमाअंतर्गत शेवता, तारु पिंपळवाडी, जोगेश्वरी, लामगव्हाण, वाडगाव, तोंडुळी या ठिकाणी वयोवृध्द ग्रामस्थांकरिता "सर्व रोग निदान शिबिर" आयोजित करण्यात आले होते.

या शिबीरामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. गणेश शिंदे यांनी रुग्णांची तपासणी केली व लॅब टेक्निशियन संदिप हनुवते यांनी LFT/KFT/THYROID/HIV/CBC आदी चाचण्या करण्यासाठी रक्ताचे नमुने घेऊन वयोवृद्ध नागरिकांची आरोग्य तपासणी करून सर्वांना औषधी वाटप केले. त्यामध्ये प्रामुख्याने 60 वर्षाच्या पुढील ज्येष्ठ नागरिकांची उच्चरक्तदाब, मधुमेह तपासणी, असंसर्गजण्य आजाराची तपासणी, गरोदर माता, संशयित कुष्ठरोग, क्षयरोग रुग्णाची तपासणी करण्यात आली. त्याप्रसंगी मुलानी वाडगाव येथील आशा कार्यकर्ती वर्षा शेळके, जया जगताप, तारु पिंपळवाडी येथील नंदा थोटे, शेवता येथील अल्का घटे, तोंडूली येथील आरती पठाडे, गंगासागर गरड, जोगेश्वरी येथील आशा कार्यकर्ती लंका गुंजाळ यांनी परिश्रम घेतले. सर्व गावकरी मंडळ यांनी सहकार्य केले, त्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या उपक्रमास मुलानी वाडगाव आरोग्य वार्धिनी उपकेंद्राचे आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, सर्व कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी अथक परिश्रम घेतले.

# मोकाट कुत्र्यांच्या सुळसुळाटामुळे एकतानगरवासी त्रस्त

## मनपा प्रशासन नागरिकांच्या तक्रारीची दखल घेईना

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**औरंगाबाद :** संभाजीनगर जिल्ह्यातील एकतानगर या वर्दळीच्या परिसरात मोकाट कुत्र्यांचा अगदी सुळसुळाट बघायला मिळत आहे. या परिस्थितीमुळे परिसरातील सर्वच नागरिक, शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक आदींनी त्रस्त होऊन मनपाकडे तक्रार देखील दाखल केली आहे परंतु मनपा प्रशासन आमच्या तक्रारीची कुठलीच दखल घेत नाही आणि आमच्या तक्रारीची टाळाटाळ करीत आहे अशी खंत नागरिकांनी दै. आधुनिक केसरी सोबत बोलतांना व्यक्त केली.

एकतानगर परिसरात भरणाऱ्या भाजी मंडई जवळ मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट पाहायला मिळत असून रोड ने ये-जा करणारे शाळकरी मुले, वयोवृद्ध



नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पाहायला मिळत असून रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांवर ही मोकाट कुत्रे थेट हल्ला करतात. यांमुळे लहान मुले, आणि वयोवृद्ध यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**एकतानागर परिसरात मोकाट कुत्र्यांच्या भीतीने सर्व नागरिक त्रस्त झाले असून कुत्र्यांनी चावा घेतल्यावर यांस जबाबदार कोण राहील? म्हणून आम्ही मनपाकडे तक्रार केली परंतु मनपा प्रशासनाने आमच्या तक्रारीची कुठलीच दखल घेतली नसल्याने नागरिकांत प्रचंड नाराजगी झाली आहे...!**

**विशाल चव्हाण**
**(रहिवासी, एकतानागर)**

शाळकरी मुलांना सुद्धा याच रस्त्याने प्रवास करावा लागतो परंतु मोकाट कुत्र्यांच्या भीतीपोटी मुलांच्या शाळा देखील बुडत आहे. आणि नागरिकांनी कंटाळून मनपा प्रशासनाकडे तक्रार करुन देखील प्रशासन त्याची कुठलीही दखल घेत नसल्याने नागरिक आक्रमक होतांना दिसत आहे..!

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक च्या पुणे शाखेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार व ५० गरीब व गरजू, दिव्यांग, कर्णबधिर, मुकबधीर विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात येणार आहे. शनिवार दि.३० रोजी सायंकाळी ५.०० वाजता, ब्राह्मण मंगल कार्यालय, सदाशिव पेठ, पेरुगेट पोलिस चौकी जवळ, मांडके हिअरिंग एड समोर, पुणे येथे हा पुरस्कार सोहळा संपन्न होत आहे.

यावेळेस श्रीमती सुमेधा सरदेसाई यांच्या संकल्पनेतून आणि सहकार्याने मराठी, संस्कृत, पीएच.डी., एम.ए.बी.ए., मोडीलिपीतील गुणवंत विद्यार्थी अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. मराठी भाषा आदर्श शिक्षक पुरस्कार : श्रीमती सुमनताई बेलवलकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रामचंद्र देखणे (विद्या वाचस्पती) हे आहेत तर अध्यक्षस्थानी कृष्णकुमार गोयल आदर्श शिक्षक - स्वाती कुलकर्णी (संस्कृत, आदर्श शिक्षिका), अमृता अराणके (दिव्यांग, विद्यार्थी शिक्षिका), वेदमूर्ती मंदार शहरकर (घनपाठी गुरुजी), मृणालिनी कानिटकर जोशी (मराठी) हे भुषविणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन पुणे केंद्र कार्यकारिणी सदस्य यांनी केले आहे. या कार्याक्रमास रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थीत रहावे, असे आयोजकांनी विनंती केली आहे. आधिक माहितीसाठी ०२०-२४४३६९२२ या नंबरवर आपण संपर्क करू शकता.

# टिटवी येथे मृतावस्थेत सापडलेल्या अस्वलाचा केला अंत्यविधी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या टिटवी शिवारामधील अजिंठा वन परिक्षेत्र टिटवी कक्ष क्रमांक 530, गट क्रमांक 31 मधील राखीव वनमध्ये आढळलेला नर जातीचा अस्वल मृतावस्थेत पडला असल्याची माहिती वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधीकारी सोनवणे अजिंठा यांच्यासह परिमंडळ सावळदबाराचे वनपाल अविनाश राठोड, शिंदे तसेच वनरक्षक चाथे, जाधव, राठोड, वाघ, खर्डे, नन्नावरे, बेराड आणि वन मजुर यांना दिली. वरखेडी खुर्द येथील मृत बिबट्याची घटना ताजी असतानाच पुन्हा ही अस्वलाची घटना घडली. सदरील अस्वलाचा पंचनामा करुन त्याचठिकाणी अंत्यविधी करण्यात आला.

हे पथक घटनास्थळी दाखल झाले असता त्यांना एक नर अस्वल मृतावस्थेत आढळुन आला त्याचे वय अंदाजे अकरा ते बारा वर्ष असून 120 ते 125 किलो त्याचे वजन होते. जाईचादेव मंदिर आणि कालिंका देवी मंदीर या दोन मंदिरांच्या डोंगर दऱ्यामध्ये दहा पैसे म्हणून एक खोरा आहे. त्या खोऱ्याच्या बाजुला अस्वल मृतावस्थेत आढळुन आला. सदर प्रकरणात स्थळ पंचनामा नोंदवून वनरक्षक टिटवी यांनी वनगुन्हा नोंद केला. सदर अस्वल हा डोंगर उतारावरून घसरून पडला असल्याची शक्यता असून त्याचा मृत्यू अंदाजे 4 ते 5 दिवसांपूर्वी झाला असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.त्यानंतर टिटवी कक्ष क्र 530 येथे मृत अस्वल वन्यप्राण्याचे डॉ. रमण इंगळे, डॉ. नौशाद शहा व डॉ. राकेश चव्हाण तीन पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी-1 यांचे पथकाकडून शवविच्छेदन करण्यासाठी चिरफाड करण्यात आली. तथापि सदर वन्यप्राण्याच्या शरीरात अळ्या पडल्यामुळे व ते कुजल्यामुळे त्याच्या महत्वाच्या अवयवाचे नमुने पुढील तपासणीकामी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यासाठी घेता आले नाहीत. तदनंतर मृत वन्यप्राण्याचे त्याच जागेवर सरण रचून अंतिम संस्कार करण्यात आला.

सदरची कायदेशीर प्रक्रिया मुख्य वनसंरक्षक औरंगाबाद वनवृत्त सत्यजित गुजर, उपवनसंरक्षक औरंगाबाद वनविभाग सूर्यकांत मंकावार आणि सहाय्यक वनसंरक्षक पुष्पा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरीक्षेत्र अधिकारी सोनवणे, वनपाल राठोड, शिंदे, वनरक्षक तसेच पत्रकार बंन्धू जब्बार डि.तडवी, जब्बार एस.तडवी, रहिमखान व जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, अजिंठा वनपरीक्षेत्रात कार्यरत वनमजूर यांनी पूर्ण केली.

# डॉ.सौ.इं.भा.पा. महिला महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** येथील डॉ.सौ.इं.भा.पा. महिला महाविद्यालयात दि.२८ जुलै २०२२ नवीन अभ्यासक्रमावर आधारीत प्राध्यापकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालायच्या प्राचार्या डॉ.वसुधा पुरोहित या होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक डॉ.प्रशांत अमृतकर (अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) हे होते. तर दुसरे मार्गदर्शक प्रा.डॉ. उमेश बगाडे (इतिहास विभाग - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) हे होते.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. प्रथम वर्षाचा CHOICE BASED CREDIT AND GRADING SYSTEM नुसार अभ्यासक्रम जुलै २०२२ पासून सुरू करण्यात यावा अश्या विद्यापीठाच्या सूचना आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार नवीन शैक्षणिक संकल्पना अजूनही पूर्णपणे माहीत झालेल्या नाहीत. यासंदर्भात प्राध्यापकांना मार्गदर्शन करण्याची गरज लक्षात घेऊन महाविद्यालयाने या कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

प्रा.डॉ. प्रशांत अमृतकर यांनी "CHOICE BASED CREDIT AND GRADING SYSTEM विषयी भूमिका व उपयोजन" या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, या नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदल घडून येणे अपेक्षित आहे. यासाठी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण होऊन त्यांचे शिक्षण नोकरी मिळवणे इतके मर्यादित न राहता ते दुसऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकतील इतकी क्षमता विकसित व्हावी तसेच जास्तीत जास्त विद्यार्थी उद्योग क्षेत्राकडे वळावेत यादृष्टीने या अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना क्रेडिट कशाप्रकारे द्यावेत याबद्दल सविस्तर माहिती दिली. नंतर त्यांनी प्राध्याकांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.

प्रा.डॉ.उमेश बगाडे यांनी "CHOICE BASED CREDIT AND GRADING SYSTEM संकल्पना, स्वरूप आणि उपयोजन" या विषयावर मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी ही सिस्टीम अतिशय उपयुक्त आहे. शिक्षणामध्ये समानता निर्माण व्हावी तसेच विद्यार्थ्यांच्या विकासाच्या क्रमानुसार, आवडीनुसार विषय निवड स्वातंत्र्य ह्या पद्धतीत आहे. असे असले तरी सर्वच आवडीचे विषय निवडता येतील असे नाही. यातील अनेक कोर्सेस घेण्यासाठी काही मर्यादा येतात. अर्थात कोणतीही नवीन सुरवात करताना काही अडचणी या येणारच पण विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी मापनाचा आकृतिबंध स्विकारणे आवश्यक आहे. अशा कार्यशाळेच्या माध्यमातून त्या समजून घेणे आवश्यक आहे. नंतर त्यांनी प्राध्याकांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.

अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वसुधा पुरोहित यांनी ह्या कार्यशाळेच्या आयोजनामागील आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्या म्हणाल्या, बी.ए. प्रथम वर्षाचा जून २०२२ या वर्षापासून "CHOICE BASED CREDIT AND GRADING SYSTEM" नुसार अभ्यासक्रम सुरू झाला आहे. या अभ्यासक्रमासंदर्भात प्राध्यापकांमध्ये संभ्रामावस्था आहे. प्राध्यापकांमध्ये वैचारिक स्पष्टता यावी यासाठी योग्य आणि परिपूर्ण मार्गदर्शनाची गरज लक्षात घेऊन या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले तसेच या नवीन शैक्षणिक धोरणावर, शिक्षणव्यवस्थेवर मूलभूत चिंतन व्हावे, प्राध्यापकांची तात्विक बैठक निर्माण व्हावी हा उद्देश असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.रजनी सेनाड यांनी केले तर आभार प्रगटन प्रा.डॉ. मिनाक्षी निमकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. संध्या देशपांडे व प्रा.डॉ.सुषमा देशपांडे यांनी करून दिला. या कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालायतून १५० प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

# सौंदर्याचा सल्ला





डॉ. उज्ज्वला दहिफळे
(एम.सी.एच.प्लास्टिक सर्जरी)
ॲस्थॅटिक, लेसर ॲण्ड प्लास्टिक सर्जन

## पायावरील फुगलेल्या शिरांवर लेसर उपचार

आधुनिक केसरी

**उपचार**

**१) प्रेशर गारमेंटस :** झोपताना पायाखाली उशी देवुन पाय वर करणे व त्यावर स्टॉकीग्ज (पायातील प्रेशर आणणारा मोजा) लावणे हा तात्पुरता उपाय असतो. २) जुण्या काळात या पायावरील फुगलेल्या शिरा काढणे हा अतिशय अवघड प्रकार होता. ३) ज्या ठिकाणी शिरा वाढलेल्या आहेत त्या पुर्ण पायावर चिरा देऊन व एक वायर टाकुन पुर्ण शिर ही काढली _जायची जी अतिशय त्रासदायक प्रक्रीया होती जी आता भुतकाळात जमा झाली आहे. ४) EVIT (ई व्हि एल टी) एन्डोव्हीनस लेसर ट्रीटमेंट हे आता यासाठी एक मोठे वरदान ठरले आहे. ५) निदान करण्यासाठी व वाढलेल्या शिरेचा नकाशा काढण्यासाठी कलर डॉपलर ही टेस्ट केली जाते. ६) इतर रक्त तपासण्या व फिटनेस केले जाते.. ७) EVLT ही प्रक्रीया अवघ्या ३० ते ४५ मिनीटांची असुन यामध्ये लहान असा लेसर फायबर हा पायावरील शिरेतुन इंजेक्शन दिल्याप्रमाणे शिरेत टाकला जातो. ८) हळु हळु लेसर मशीन चालु करुन ही फायबर बाहेर ओढली जाते.व लेसर ऊर्जा ही शिरेच्या आतील भागावर प्रक्रीया करुन शिर ही बंद केली जाते. अशा प्रकारे या सर्व शिरा बंद केल्या जातात. ९) प्रक्रीया पुर्ण झाल्यावर पायावर (प्रेशर) क्रेप बँडेज लावले जाते. १०) लेसर मुळे प्रक्रीया ही लवकरात लवकर होउन दोन दिवसात घरी जाता येते.

**पायावरील फुगलेल्या शिरांचा उपचार न केल्यास खालील दुष्परीणाम**

१) CVI ( कॅनीक व्हीनस इन सफिशिअन्सी ) जेव्हा शिरेच्या झडपा कमकुवत होतात व काम करत नाहीत त्यावेळी त्याला CVI म्हणतात. ज्यामुळे रक्त प्रवाहात अडथळा येतो व शिरातील रक्त दाब वाढुन रक्त पुरवठा खंडीत होण्याची शक्यता वाढते. २) वाढलेल्या दाबामुळे छोटया कॅप्रीलरीज (वाहीण्या) फुटतात व रक्त स्त्राव होतो आणि आजुबाजूच्या स्नायुवर त्याचा परिणाम होतो व शेवटी पायावर जखमा तयार होतात ३) फ्लेबायटीस - यामध्ये रक्ताची गुठळी तयार होते व ज्यामुळे पाय दुखतो. ४) व्हॅरीकोज अल्सर - व्हरीकोज व्हेनच्या निष्काळजीपणामुळे पायावर जखमा तयार होणे याला अल्सर म्हणतात. शिरामध्ये वाढलेल्या दाब व शिरामध्ये पाणी जमा झाल्यामुळे त्वचा खराब होते व अल्सर तयार होतो. या सर्व गोष्टी टाळायच्या असतील व आपले पाय सुदंर व सुबक ठेवायचे असतील तर अशा प्रकारच्या व्याधीपासून काही दुष्परीणाम होण्याच्या आतच तज्ञ प्लास्टीक व कॉस्मॅटीक सर्जनला भेटुन लेसर उपचार घेणे हे अत्यंत आवश्यक आहे.

पुण्या मुबईपेक्षा स्वस्त दरात ही सुविधा औरंगाबादमध्ये दहिफळे हॉस्पीटल येथे असुन डॉ. उज्वला दहिफळे, या पायावरील फुगलेल्या शिरांसाठी मराठवाडयात प्रथमच लेसर उपचार करतात.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9850822648, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# सुरज शेजवळला कुस्ती स्पर्धेत गोल्ड

आधुनिक केसरी न्यूज



**देव्हारी :** सुरज रवी शेजवळ यांनी स्टुडंट ऑलम्पिक स्पर्धा हरिद्वार उत्तराखंड येथे झालेल्या कुस्ती स्पर्धा 43 किलो वजनी गटामध्ये गोल्ड मेडल पटकावले असून मुंबई येथे झालेल्या स्पर्धेतही गोल्ड मेडल पटकावले. सुरज शेजवळ यांनी औरंगाबादसाठी तसेच महाराष्ट्राचे नाव लौकिक केले तसेच त्यांचे प्रशिक्षण राम दुलारी यांनी सूरजला कालु पहेलवान कुस्ती तालीम येथे प्रशिक्षण देत होते. सूरज हा शाळेत 9 वि वर्गात सेंट जॉन टी पॉईंट या शाळेत शिक्षण घेत आहे. सुरज हा औरंगाबाद येथील जटवाडा रोड सुभाष नगर अंबर हिल येथील रहिवाशी आहे. त्यांच्या वडिल रवी शेजवळ यांनी आपल्या मुलाकडून कठीण परिश्रम करून सुरज भविष्यात नॅशनल ऑलम्पिकमध्ये सुद्धा खेळेल व औरंगाबाद व देशाचे नाव करेल अशी इच्छा व्यक्त केली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in